# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७४ । शनिवार, दि.१८ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com


## श्रीरामपूर दंगल : ५० जण निर्दोष

**श्रीरामपूर :** सन २०१६ मध्ये श्रीरामपूर शहरात किरकोळ कारणावरून उसळलेल्या दंगलीप्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहेत. या दंगलीदरम्यान फ्रुट मार्केटला आग लावल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील सर्व ५० आरोपींची न्यायमूर्ती एन. एस. साळवे यांनी पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.(दि.८ ) मे २०१६ रोजी एका रिक्षा चालकाला झालेल्या मारहाणीच्या घटनेतून हा वाद चिघळला होता. या वादाचे रूपांतर दोन गटांतील संघर्षात होऊन संतप्त जमावाने फ्रुट मार्केटला आग लावली होती. याप्रकरणी पोलिसांनी प्रकाश चित्ते मारुती बिंगले, विजय जयस्वाल यांच्यासह ५० जणांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले होते. न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे अनेक साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, आरोपींविरुद्ध कोणताही ठोस पुरावा सादर न झाल्याने न्यायालयाने सर्वांची निर्दोष मुक्तता केली. आरोपींच्या वतीने ॲड. ए. पी. परदेशी, ॲड. एजाज पठाण, ॲड. पंकज म्हस्के, ॲड. आरीफ शेख आणि ॲड. मयुर गांधी यांनी काम पाहिले. या निकालामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या खटल्याचा कायदेशीर प्रवास अखेर संपला आहेत.

# राज्यातील १५,१५५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा बिगुल वाजणार

## ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी, त्यानंतर कधीही आचारसंहिता!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील तब्बल १५ हजार १५५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची प्रक्रिया आता निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. राज्य निवडणूक आयोगाने प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला असून ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर कोणत्याही क्षणी ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता असल्याने राज्यातील ग्रामीण राजकारणाला वेग आला आहे.

सन २०२४-२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी आयोगाने यापूर्वीच प्रभागनिहाय आरक्षण प्रक्रिया पूर्ण केली आहे. आता मतदार यादी अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून १५ एप्रिल २०२६ रोजीच्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीच्या आधारेच ग्रामपंचायतींची मतदार यादी तयार केली जाणार आहे. त्यामुळे या प्रक्रियेत नवीन नावे समाविष्ट करणे, नावे कमी-जास्त करणे किंवा दुरुस्ती करण्यास संधी नसणार आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी २४ जुलै रोजी ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय, पंचायत समिती व तहसील कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर २९ जुलैपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जातील. त्यानंतर ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल.

प्रशासनाच्या आतापर्यंतच्या अनुभवावरून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर साधारण आठ ते पंधरा दिवसांत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला जातो. मात्र, यंदाचा पावसाळा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेता प्रत्यक्ष मतदान ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यातील हजारो गावांच्या सत्तासमीकरणावर परिणाम करणाऱ्या या निवडणुकांकडे सर्वच राजकीय पक्षांनी लक्ष केंद्रित केले असून, ग्रामीण भागात राजकीय हालचालींना आता अधिक वेग येण्याची चिन्हे आहेत.

### दृष्टिक्षेपात कार्यक्रम

**मतदार यादी ग्राह्य दिनांक : १५ एप्रिल २०२६**
**प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी : २४ जुलै**
**हरकती व सूचना : २९ जुलैपर्यंत**
**अंतिम मतदार यादी : ४ ऑगस्ट**
**त्यानंतर : निवडणूक कार्यक्रम कधीही जाहीर होण्याची शक्यता**

## महत्वाचे...

### श्रीरामपुरात महिला नगरसेविकेची इन्स्टाग्रामवर बदनामी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** इन्स्टाग्रामवर आक्षेपार्ह फोटो आणि मजकूर प्रसारित करून एका महिला नगरसेविकेची बदनामी केल्याचा धक्कादायक प्रकार श्रीरामपूर शहरात घडला आहेत. याप्रकरणी संबंधित नगरसेविकेच्या फिर्यादीवरून 'shrirampur.05' या इन्स्टाग्राम अकाउंट व्यक्तीविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

नगरसेविकेने फिर्यादीत नमूद केले की, आरोपीने त्यांचा फोटो एडिट करून त्यात आक्षेपार्ह मजकूर लिहिला. तसेच काही लोकप्रतिनिधी आणि माजी पदाधिकाऱ्यांची नावे वापरून बदनामीकारक आरोप केले. या पोस्टमुळे आपली सामाजिक व वैयक्तिक प्रतिमा मलीन होऊन मानसिक त्रास झाल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

# भगवानबाबा मल्टिस्टेट पतसंस्थेत ठेवीदारांचा 'विश्वासघात'!

## २.४४ कोटींची फसवणूक; चेअरमन, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यासह सात जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सहकाराची राजधानी म्हणून ओळख असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यात पुन्हा एकदा ठेवीदारांचा विश्वास डळमळीत करणारा मोठा आर्थिक घोटाळा समोर आला आहे. श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट पतसंस्थेने तब्बल २ कोटी ४४ लाख ४२ हजार ३७७ रुपयांच्या ठेवी परत न करता गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी चेअरमन, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर संचालकांसह सात जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील सहकारी व मल्टिस्टेट पतसंस्थांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### घोटाळा एका नजरेत

- **फसवणुकीची रक्कम : २,४४,४२,३७७**
- **संस्था : श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट पतसंस्था**
- **गुन्हा दाखल : ७ पदाधिकाऱ्यांविरुद्ध**
- **ठिकाण : मुख्य कार्यालय व चाणक्य चौक शाखा, अहिल्यानगर**
- **पोलीस ठाणे : कोतवाली**

फिर्यादी सतीश रामचंद्र पटारे (रा. बु-हानगर, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी व इतर ठेवीदारांनी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात तसेच बुरुडगाव रस्त्यावरील चाणक्य चौक शाखेत मुदत ठेवी व फिक्स डिपॉझिटच्या स्वरूपात मोठी रक्कम गुंतवली होती. ठेवींची मुदत पूर्ण झाल्यानंतरही संस्थेने व्याजासह रक्कम परत करण्यास नकार दिला. ठेवीदारांच्या पैशांचा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी वापर केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी मंदाकिनी रंगनाथ वैद्य (चेअरमन), मथुर रंगनाथ वैद्य (उपाध्यक्ष), जयशाली मयुर वैद्य (मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक), नितीन तुपे, शांतीनाथ साखरे, राम पोपळघट आणि किशोर सुरवसे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे आणि गणेश देशमुख पुढील तपास करत आहेत.

### सहकाराचा जिल्हा की आर्थिक घोटाळ्यांचे केंद्र?

**अहिल्यानगर जिल्हा हा राज्यातील सहकारी बँका, नागरी पतसंस्था, मल्टिस्टेट पतसंस्था आणि विविध वित्तीय संस्थांचे मोठे केंद्र मानला जातो. गेल्या काही वर्षांत अनेक पतसंस्थांमध्ये आर्थिक गैरव्यवहार, ठेवी अडकणे आणि ठेवीदारांची फसवणूक झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या नव्या गुन्ह्यामुळे मल्टिस्टेट पतसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण, लेखापरीक्षण आणि नियामक यंत्रणेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ठेवीदारांच्या कष्टाच्या पैशांची सुरक्षितता हा आता केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक विश्वासाचाही विषय बनला आहे.**

# अहिल्यानगर जिल्ह्यातील धरण साठ्यात १५ टीएमसीची तूट

## भंडारदरा ६१.७५ टक्के, मुळा केवळ ४०.६५ टक्के भरले



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** यंदाच्या पावसाळ्यात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठा गतवर्षीच्या तुलनेत लक्षणीय घटल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यातील १३ प्रमुख प्रकल्पांमध्ये १७ जुलैअखेर एकूण २९.२८३ टीएमसी पाणीसाठा असून, तो गतवर्षीच्या तुलनेत १५.६६ टीएमसी (२६.७१ टक्के) तूट असल्याची माहिती निवृत्त अभियंता तथा जलसंपत्ती अभ्यासक हरिश्चंद्र चकोर यांनी दिली.

चकोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील भंडारदरा धरणात ६.८१७ टीएमसी (६१.७५ टक्के), निळवंडे धरणात २.९१९ टीएमसी (३५.०३ टक्के), मुळा धरणात १०.५७० टीएमसी (४०.६५ टक्के), आढळा धरणात ०.८९६ टीएमसी (८४.५३ टक्के), सीना धरणात ०.७४७ टीएमसी (३१.१३ टक्के), घोड धरणात ५.८११ टीएमसी (९७.१९ टक्के) तर भोजापूर धरणात २२७ दशलक्ष घनफूट (६२.८८ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. यंदा जिल्ह्यातील पर्जन्यमान कमी राहिल्यामुळे पाणीसाठ्यावर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.

(उर्वरीत पान ४ वर)

# 'महेश ट्युटोरियल्स'ने गाशा गुंडाळला देशभरातील शाखा बंद

## लाखो रुपये फी भरलेल्या पालकांमध्ये चिंता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील नामांकित खासगी शिकवणी संस्थांपैकी एक असलेल्या महेश ट्युटोरियल्स (एमटी एज्युकेअर) ने अचानक आपल्या शाखा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. ७ जुलै रोजी शाखाचालकांची तातडीची बैठक झाल्यानंतर १० जुलैपासून राज्यातील सर्व शाखा बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

बारावी, नीट, जेईई, सीबीएसई, आयसीएसई तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणारी ही संस्था गेल्या ३८ वर्षांपासून कार्यरत होती. मुलुंड येथून सुरू झालेल्या या संस्थेच्या राज्यभरात सुमारे ६० शाखा असून त्यापैकी ४० शाखा मुंबई महानगर क्षेत्रात होत्या. अनेक पालकांनी लाखो रुपयांचे शुल्क आगाऊ भरले असल्याने आता त्या रकमेचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

शाखा बंद झाल्यानंतर अनेक पालकांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र बहुतांश शाखांचे दूरध्वनी बंद असून काही ठिकाणी प्रतिसादही मिळत नसल्याची तक्रार आहे.

(उर्वरीत पान ४ वर)

# कामरगावच्या कामक्षा माता मंदिरात चोरी

## चांदीचा मुकुट, सोन्याचे दागिने लंपास

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर-पुणे महामार्गावरील कामरगाव (ता. नगर) येथील ग्रामदैवत कामक्षा माता मंदिरात शुक्रवारी पहाटे अज्ञात चार चोरट्यांनी मोठी चोरी करून देवीचा चांदीचा मुकुट, चांदीचा मुखवटा, दोन पितळी मुकुट तसेच मूर्तीवरील सोन्याचे दागिने लंपास केले. ही संपूर्ण घटना मंदिरातील आणि बाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

शुक्रवारी पहाटे सुमारे ३.१० वाजता चार चोरटे मंदिर परिसरात आले. त्यांनी तोंडाला रुमाल बांधले होते आणि हातात हातमोजे घातले होते. लोखंडी ग्रीलचे कुलूप तोडून दोघे चोरटे मंदिराच्या गाभाऱ्यात शिरले, तर अन्य दोघे बाहेर पहारा देत उभे होते. अवघ्या तीन मिनिटांत त्यांनी देवीचे दागिने व अन्य मौल्यवान वस्तू चोरून पलायन केले.चोरीपूर्वी चोरट्यांनी मंदिरालगतच्या काही घरांना बाहेरून कड्या लावल्या होत्या. तसेच गावातील दोन बंद घरांमध्येही उचापती केल्याची माहिती समोर आली आहे.घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मंदिर व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्यात आले असून त्याआधारे संशयितांचा शोध सुरू आहे. काही दिवसांपूर्वी संशयितांपैकी एकाने परिसराची रेकी केल्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

याप्रकरणी मंदिर ट्रस्टचे सचिव संदीप रामचंद्र गुंजाळ यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे करीत आहेत.

# जयंत पाटील उजव्या वळणावर...

## पक्षांतर टाळण्याचे काँग्रेसचे आवाहन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे 'एनडीए'मध्ये सामील होऊन 'उजव्या वळणावर' जाणार असल्याच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगू लागल्या आहेत. या सर्व घडामोडींवर काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील यांनी अत्यंत सूचक आणि महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे. जयंत पाटील यांच्या भूमिकेपासून ते राज्यातील कर्जमाफी आणि शक्तीपीठ महामार्गाच्या वादावर सतेज पाटील यांनी महायुती सरकारवर घणाघाती टीका केली.जयंत पाटील यांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चेवर सतेज पाटील म्हणाले, जयंत पाटील हे एनडीए सोबत जाऊ नये अशी आमची प्रामाणिक अपेक्षा आहे. जयंत पाटील हे शाहू, फुले, आंबेडकर

(उर्वरीत पान ४ वर)

# हृदय जपणारा डॉक्टर... स्वत:चा जीव वाचवू शकला नाही!

## हृदयरोगतज्ज्ञ डॉ. मेहुल राठोड यांच्या मृत्यूने महाराष्ट्र सुन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लातूर :** रुग्णांना नवजीवन देणाऱ्या हातांनी अखेर स्वतःच्या आयुष्यालाच पूर्णविराम दिला... लातूरचे प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. मेहुल राठोड यांच्या संशयित आत्महत्येने संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले आहे. मोठे रुग्णालय, यशस्वी वैद्यकीय कारकीर्द, डॉक्टर पत्नी, समाजातील प्रतिष्ठा आणि आर्थिक स्थैर्य... सर्व काही असूनही एका यशस्वी डॉक्टरच्या मनात एवढा संघर्ष सुरू होता का, हा प्रश्न आता सर्वांनाच अस्वस्थ करत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, डॉ. राठोड यांचा मृतदेह त्यांच्या इनोव्हा कारमध्ये आढळला. भूल देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधाचा अतिप्रमाणात डोस घेतल्याचा संशय व्यक्त होत असला, तरी मृत्यूचे नेमके कारण पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.निकटवर्तीयांच्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी त्यांनी एका जिवलग मित्राला, मी मेल्यानंतर तूच मला खांदा देशील, असे सहजपणे सांगितले होते. त्यावेळी ते विनोद म्हणून घेतले गेले. मात्र, आज त्याच वाक्याने अनेकांना अंतर्मुख केले आहे.

तपासादरम्यान काही मुद्दे समोर येत आहेत. अत्याधुनिक कॅथलॅबसाठी घेतलेले मोठे कर्ज, रुग्णालयातील सतत बदलणारा कर्मचारी वर्ग, वाढता व्यावसायिक ताण आणि पुण्यात स्थलांतराबाबत कुटुंबात सुरू असलेली चर्चा यामुळे ते मानसिक तणावात असावेत, अशी माहिती निकटवर्तीयांकडून समोर येत आहे. मात्र, या कारणांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. दरम्यान, डॉ. राठोड यांचा फेस लॉक असलेला आयफोन अद्याप उघडता आलेला नाही.

(उर्वरीत पान ४ वर)

### यशाचा चेहरा हसरा... मन मात्र एकाकी?

**आज मानसिक तणाव हा केवळ सर्वसामान्यांचा प्रश्न राहिलेला नाही. डॉक्टर, उद्योजक, अधिकारी, व्यावसायिक अशा उच्च जबाबदारीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनाही प्रचंड मानसिक दडपणाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे मानसिक आरोग्य ही कमकुवतपणाची नव्हे, तर सार्वजनिक आरोग्याची गंभीर बाब आहे, हा संदेश या घटनेतून समोर येतो.**



### तपासातील प्रमुख मुद्दे

- अत्याधुनिक कॅथलॅबसाठी मोठे कर्ज घेतल्याची माहिती
- रुग्णालयातील सतत बदलणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे वाढलेला ताण
- पुण्यात स्थलांतराबाबत कुटुंबात चर्चा
- फेस लॉकमुळे मोबाईलमधील माहिती मिळविण्याचे पोलिसांसमोर आव्हान
- मृत्यूमागील नेमके कारण अद्याप तपासाधीन




# शिक्षणाचा बदलता बाजार कुणाच्या हिताचा..?

**एकेकाळी ''चांगले शिक्षण म्हणजे चांगली शाळा'' ही संकल्पना होती. कालांतराने ती बदलून ''चांगली शिकवणी म्हणजे चांगले शिक्षण'' अशी झाली. गेल्या तीन दशकांत खासगी शिकवणी उद्योगाने भारतीय शिक्षणव्यवस्थेवर इतका प्रभाव टाकला की अनेक पालकांसाठी शाळा ही केवळ औपचारिकता आणि शिकवणी हा खरा शिक्षणाचा आधार बनला. आज देशभरातील नामांकित शिकवणी संस्थांपैकी एक मानली जाणारी महेश ट्युटोरियल्स (एमटी एज्युकेअर) आर्थिक संकटामुळे जवळपास ६० शाखांना कुलूप लावत असल्याची घटना ही केवळ एका कंपनीच्या अपयशाची कथा नाही; ती भारतातील हजारो कोटी रुपयांच्या खासगी शिक्षण बाजारातील मोठ्या बदलाची घंटा आहे.**

-------------

महेश शेट्टी यांनी १९८८ मध्ये मुंबईतील एका छोट्याशा वर्गातून सुरू केलेली महेश ट्युटोरियल्स ही संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे अल्पावधीतच विश्वासार्ह ब्रँड ठरली. आठवी-दहावीच्या वर्गांपासून सुरू झालेला प्रवास बारावी, अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश परीक्षा, जेईई, नीट, सीईटी आणि विविध स्पर्धा परीक्षांपर्यंत पोहोचला. महाराष्ट्रापुरती मर्यादित असलेली ही संस्था देशभर विस्तारली. पुढे ती एमटी एज्युकेअर या कॉर्पोरेट रूपात शेअर बाजारात सूचीबद्धही झाली. एका शिक्षकाने सुरू केलेला वर्ग कोट्यवधी रुपयांच्या उद्योगात बदलला होता.




परंतु, शिक्षण क्षेत्रातील बाजारपेठेचे नियम अत्यंत कठोर असतात. जे बदल ओळखतात ते टिकतात आणि जे बदलांकडे दुर्लक्ष करतात ते मागे पडतात. करोनानंतर ऑनलाईन शिक्षणाचा विस्फोट झाला. बायजूस, अनअॅकॅडमी, फिजिक्सवाला, वेदांतू यांसारख्या डिजिटल शिक्षण मंचांनी विद्यार्थ्यांपर्यंत थेट पोहोचण्यास सुरुवात केली. त्याचवेळी ॲलन, आकाश इन्स्टिट्यूट, रेसोनन्स, फिटजी, मोशन एज्युकेशन, नारायणा, श्री चैतन्य यांसारख्या राष्ट्रीय ब्रँड्सनी स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात आक्रमक विस्तार केला. परिणामी पारंपरिक शिकवणी संस्थांसमोर अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला.

आज खासगी शिकवणी उद्योगाचा वार्षिक उलाढाल हजारो कोटी रुपयांवर पोहोचला आहे. पालक मुलांच्या शिक्षणासाठी दोन ते तीन लाख रुपये सहज खर्च करू लागले आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवायचे असेल तर शिकवणी अपरिहार्य आहे, अशी मानसिकता समाजात निर्माण झाली. ही मानसिकता तयार करण्यात काही मोठ्या शिकवणी संस्थांचा वाटा असला तरी त्यासाठी आपल्या शिक्षण व्यवस्थेलाही जबाबदार धरावे लागेल.

आज अनेक शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा अभाव, शिक्षकांवरील वाढता प्रशासकीय ताण, अभ्यासक्रमातील गुंतागुंत, परीक्षांचे वाढते स्वरूप आणि गुणांच्या स्पर्धेने पालकांना शिकवणीकडे ढकलले आहे. परिणामी शिक्षण हा सामाजिक अधिकार न राहता एक व्यावसायिक उत्पादन बनला. विद्यार्थी हा विद्यार्थी न राहता ग्राहक बनला आणि पालक गुंतवणूकदार.

याच बाजारपेठेत गेल्या काही वर्षांत मोठे बदल झाले. ऑनलाईन वर्गांमुळे भौगोलिक मर्यादा संपल्या. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), वैयक्तिक अभ्यास विश्लेषण, डिजिटल चाचण्या, रेकॉर्डेड व्याख्याने आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून शिक्षण देणाऱ्या संस्थांनी पारंपरिक वर्गखोल्यांना मोठे आव्हान दिले. आता विद्यार्थी मुंबईत बसून कोटातील शिक्षकांकडून शिकतो, तर पुण्यातील विद्यार्थी दिल्लीतील तज्ज्ञांचे व्याख्यान ऐकतो. शिक्षणाचे केंद्रीकरण तंत्रज्ञानाने मोडून काढले आहे.

याच काळात काही एडटेक कंपन्यांनी प्रचंड गुंतवणूक, आक्रमक जाहिरात आणि अवास्तव विस्ताराचा मार्ग स्वीकारला. करोनानंतर ऑफलाईन शिक्षण पुन्हा सुरू होताच अनेक कंपन्यांची आर्थिक गणिते बिघडली. बायजूससारख्या जगप्रसिद्ध कंपनीलाही गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. एमटी एज्युकेअरची दिवाळखोरीही याच व्यापक बदलांचा भाग म्हणून पाहावी लागेल.

मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत सर्वाधिक भरडला गेला तो विद्यार्थी आणि पालक. लाखो रुपये आगाऊ भरल्यानंतर अचानक वर्ग बंद होणे, दुसऱ्या संस्थेत स्थलांतराची सक्ती, शुल्क परत मिळणार की नाही याबाबतची अनिश्चितता, शिक्षणात होणारा व्यत्यय आणि मानसिक ताण ही कोणत्याही व्यवसायातील सामान्य बाब नाही. शिक्षण क्षेत्रात तर ती अधिक गंभीर आहे. कारण येथे ग्राहक हा भविष्यातील नागरिक घडविण्याच्या प्रक्रियेत सहभागी असतो.

याच कारणामुळे खासगी शिकवणी उद्योगासाठी स्वतंत्र नियामक यंत्रणेची गरज प्रकर्षाने जाणवते. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांच्यासाठी नियम आहेत; मात्र कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या अनेक खासगी शिकवणी संस्थांवर प्रभावी नियंत्रण नाही. शुल्काचे नियमन, पालकांच्या पैशांचे संरक्षण, संस्थेची आर्थिक पारदर्शकता, अचानक बंद झाल्यास पर्यायी व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे कायदेशीर संरक्षण यासाठी स्पष्ट धोरण तयार करण्याची वेळ आली आहे.

तितकेच महत्त्वाचे म्हणजे शिक्षणव्यवस्थेलाही आत्मपरीक्षण करावे लागेल. जर शाळा आणि महाविद्यालयांमधील अध्यापन प्रभावी, प्रयोगशील आणि स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम झाले, तर शिकवणीवरील अवलंबित्व आपोआप कमी होईल. शिक्षणाचा केंद्रबिंदू पुन्हा शाळा व्हायला हवा, बाजारपेठ नव्हे.

महेश ट्युटोरियल्सचे बंद होणे ही एका संस्थेची अखेर असू शकते; परंतु त्यातून मिळणारा संदेश अधिक व्यापक आहे. शिक्षणाच्या बाजारात ब्रँड बदलतील, तंत्रज्ञान बदलेल, व्यवसायाची मॉडेल्स बदलतील; पण विद्यार्थ्यांचे भविष्य कोणत्याही व्यावसायिक प्रयोगाचे साधन बनू नये. शिक्षण हा केवळ नफा कमावण्याचा उद्योग नसून समाज घडविण्याची जबाबदारी आहे. ही जाणीव सरकार, शिकवणी संस्था, शाळा आणि पालक या सर्वांनी वेळेत स्वीकारली, तरच शिक्षणाचा हा बदलता बाजार विद्यार्थ्यांच्या हिताचा ठरेल; अन्यथा उद्या आणखी एखाद्या मोठ्या शिकवणी साम्राज्याच्या बंद दारासमोर उभे राहून पालकांना पुन्हा विचारावे लागेल की, भरलेल्या शुल्काचे काय... आणि मुलांच्या स्वप्नांचे काय..?

# शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्यासाठी ना. विखे यांना शेतकरी संघटनेचे साकडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांना शेतकरी संघटनेने साकडे घातले.गुरुवार दि. १६ जुलै रोजी लक्ष्मी मंगल कार्यालय नेवासा येथे राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली मतदार पुनर्विक्षण कार्यक्रम एस आर आय याची माहिती देण्यासाठी उपस्थित होते. यावेळी त्यांची भेट शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने घेण्यात आली. व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली.



एस आर आय विषयी माहिती देताना ना.विखे यांनी सांगितले की सर्व मतदारांनी आपली मतदार नोंदणी करून घ्यावी मतदार नोंदणी झाली नाही तर आपले मतदार म्हणून मतदार यादीत नाव येणार नाही सर्व उपस्थित बीएलओ यांना सूचना देण्यात आल्या की आपण घरोघर जाऊन मतदाराची नोंदणी करावी व मॅपिंग करावी एकही मतदार वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

तदनंतर नेवासा तालुक्यातील आढावा बैठक घेऊन त्यामध्ये पाटबंधारे खात्याला चाऱ्या दुरुस्तीसाठी रक्कम मंजुरी दिलेली आहे त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर मंदिर व देवगड मंदिर यांच्या विकासासाठी भरघोस निधी दिला आहे

ॲड अजित काळे उपाध्यक्ष शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी १९ फेब्रुवारी २०२५ ते १९ मार्च २०२५ या श्रीरामपूर पुणे या ठिकाणी कृषी पुणे येथे मोर्चा नेऊन शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी यासाठी आंदोलने केली महाराष्ट्र शासनाने नुकतीच शेतकऱ्यांची कर्जमाफी व ४८ हजार कोटी रुपयाचे वीज बिल माफ केल्याचे ना. विखे यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे हिताचे निर्णय घेतल्याबद्दल शेतकरी संघटनेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच शेतकरी संघटनेने त्यांना कर्जमाफी ऐवजी कर्जमुक्ती व सरसकट सातबारा कोरा करावा अशी देखील मागणी केली

याप्रसंगी आ. विठ्ठलराव लंघे , नेवासा नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष करण घुले, शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, उपाध्यक्ष हरिभाऊ तूवर, शेतकरी संघटनेचे नेवासा तालुका अध्यक्ष मेजर अशोक काळे, संघटनेचे जेष्ठ नेते खंडेराव सरोदे, दत्तात्रेय निकम, बाबासाहेब नाबदे बाबासाहेब नागवडे बेलपिंपळगावचे मा. उपसरपंच बंडोपंत चौगुले, नेवासा तालुका युवा अध्यक्ष रोहित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# चोरावर मोर'... वरुडीत एक चोरी पकडली,

## मोधळवाडी-कर्जुलेपठारमधून २१ लाखांचे २७२ पाईप गायब!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव :** एक चोरी पकडल्यानंतर दुसऱ्या चोरीचा असा काही 'महा-स्फोट' होईल, असं कुणालाही वाटलं नव्हतं. संगमनेर तालुक्यातील जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेला चोरट्यांनी मोठा सुरुंग लावला आहे. मोधळवाडी आणि कर्जुलेपठार येथील डेपोतून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २१ लाख ५० हजार रुपयांचे २७२ लोखंडी (डी.आय.) पाईप लंपास केले आहेत. या धाडसी चोरीमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.'एस. टी.एम. एन्फ्रा प्रा. लि.' या कंपनीकडे जवळे बाळेश्वरसह १० गावांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम आहे. ९ जुलै रोजी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली तेव्हा सर्व पाईप जागेवर होते. टर्निंग पॉईंट ठरला १५ जुलैचा दिवस! वरुडी पठार येथे काही चोरटे पाईप चोरताना नागरिकांच्या आणि पोलिसांच्या तावडीत सापडले. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच कंपनीचे सुपरवायझर कृष्णा कोठवळ यांनी खबरदारी म्हणून आपल्या इतर डेपोमधील पाईप मोजायला सुरुवात केली आणि त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

# डेपो रिकामे, अधिकारी चक्रावले!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

कर्मचाऱ्यांनी जेव्हा दोन्ही मुख्य डेपो तपासले, तेव्हा तिथून लाखो रुपयांचे पाईप गायब झाल्याचे समोर आले: मोधळवाडी डेपो: इथे १०० मिमी व्यासाचे २०० पाईप होते. तपासले तेव्हा फक्त ६६ शिल्लक आढळले, म्हणजेच १३४ पाईप गायब! कर्जुलेपठार डेपो: इथे १५० मिमी व्यासाचे ३५० पाईप होते. तिथे केवळ २१२ पाईप सापडले, म्हणजेच १३८ पाईप गायब! अवघ्या ६ दिवसांत चोरट्यांनी दोन्ही डेपोंमधून एकूण २७२ पाईप (किंमत २१.५० लाख रुपये) लंपास केले.

# पोलिसांसमोर मोठं आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

वजनाने प्रचंड जड आणि आकाराने मोठे असलेले हे लोखंडी पाईप चोरट्यांनी नक्की कोणत्या वाहनातून आणि कधी पळवले? एवढी मोठी चोरी होईपर्यंत सुरक्षा यंत्रणा काय करत होती? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. सुपरवायझर कृष्णा कोठवळ यांच्या फिर्यादीवरून घारगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस आता या 'पाईप गँग'चा शोध घेत आहेत.

# प्रत्येक तालुक्याचा स्वतंत्र कृषी आराखडा करणार : विखे पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** कृषी क्षेत्राच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास साध्य करण्यासाठी प्रत्येक तालुक्याचा स्वतंत्र कृषी आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहीती जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कर्ज आणि वीजबील माफीचा झालेला निर्णय शेतकर्याच्या जीवनात नवा आशय निर्माण करणारा असल्याचे त्यांनी सांगितले. नेवासा येथे मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला आ.विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ करणसिंह घुले, भाऊसाहेब वाघ ऋषिकेश शेटे, रामचंद्र खंडागळे, प्रांताधिकारी सुधीर पाटील, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील उपस्थित होते.




मंत्री विखे पाटील म्हणाले की, नेवासा तालुक्यातील मुळा धरणाच्या चार्याच्या कामाकरीता ११०कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तिर्थक्षेत्र श्री ज्ञानेश्वर महाराज मंदीर परिसरातील घाटाचे कामही जलसंपदा विभागाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.मागील वर्षीच्या तुलनेत यंदा तालुक्यात टॅंकरची गरज भासली नाही. चांगल्या पध्दतीने झालेले पाण्याचे नियोजन आणि आ. विठ्ठलराव लंघे यांनी केलेल्या पाठपुराव्याचा परिणाम असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले. नेवासा तालुक्याच्या विकास प्रक्रीयेला निधी कमी पडणार नाही आ. लंघे यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने ३६ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला.यापुर्वी मोफत वीज देण्याच्या निर्णयाची अंमलबाजावणी सूरू झाली. आता थकलेले सुमारे ४८ हजार कोटी रुपयांच्या वीजबील माफीचा निर्णय करून शेतकर्याच्या जीवनात नवा आशय निर्माण करण्याचे काम केल्याबद्दल बैठकीत विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. मतदार याद्या सखोल पुनरिक्षण कार्यक्रमातून मतदार याद्याचे शुध्दीकरण होणार आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी यामध्ये पुढाकार घ्यावा असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले. प्रातांधिकारी सुधीर पाटील यांनी कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन केले. आ. विठ्ठलराव लंघे यांनी तालुक्यात विकास कामासाठी उपलब्ध झालेल्या निधीची माहीती आपल्या भाषणात दिली.

# कष्ट, जिद्द आणि सातत्यातूनच यश मिळते : विजयराव कुदळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना कष्ट, जिद्द आणि सातत्याच्या बळावर अभ्यास करून जीवनात प्रगती साधावी तसेच आपल्या शैक्षणिक संस्थेचा लौकिक वाढवावा, असे प्रतिपादन श्री इम्पेक्सचे संचालक तथा श्री संत सावता प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयराव कुदळे यांनी केले. नगरपालिका टिळक वाचनालयाच्या आगाशे सभागृहात श्री संत सावता प्रतिष्ठान संचलित क्रांतीज्योती महिला मंडळाच्या वतीने आयोजित कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान व दहावी, बारावी, पदवी तसेच विविध स्पर्धा परीक्षांतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्षा राजश्री ससाणे, माजी नगरसेवक दत्तात्रय साबळे, नगरसेविका आशा रासकर, आरोग्यमित्र सुभाष गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अशोक गाडेकर आदी उपस्थित होते. एव्हरेस्टवीर डरकाताई डोखे, उद्योजिका विमल गिरमे, कल्पना शेलार, क्रिकेटपटू अभिषेक पुजारी, मुख्याध्यापिका उषा गाडेकर, डॉ. सुजित व्यवहारे, डॉ. शीतल घोगरे, डॉ. स्वरदा गाडेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. माजी नगराध्यक्षा राजश्री ससाणे यांनी प्रामाणिक प्रयत्न, चिकाटी आणि गुरू-पालकांच्या मार्गदर्शनातून कोणतेही ध्येय गाठता येते, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उषा गाडेकर यांनी केले, सूत्रसंचालन कल्याणी जगताप यांनी तर आभार मोनिका अंत्रे यांनी मानले. महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# हजारो वारकऱ्यांना वैद्यकीय साहित्याची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :**श्री संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्यातील हजारो वारकऱ्यांना हभप देविदास महाराज म्हस्के, यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान झाल्यानंतर पायी चाललेल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वारकऱ्यातील वारकऱ्यांना आरोग्याच्या हितासाठी सर्वांच्या सहकार्य यांनी वैद्यकीय साहित्याची भेट स्व. तुकाराम पाटील गडाख यांच्या प्रेरणेतून युवा नेते रविराज पाटील गडाख व हनुमान ग्रामीण शिक्षक मंडळाचे पानसवाडी सचिव अध्यक्ष जयश्री ताई गडाख यांच्या उपस्थितीत भेट देण्यात आली.

प्रारंभी हभप देविदास महाराज म्हस्के यांचे रविराज पाटील गडाख व जयश्रीताई गडाख यांनी संत पूजन करून त्यांचा सन्मान केला. यावेळी जालिंदर वाकचौरे, जगन्नाथ भगत, विजयराव सदाफळ, संजय चेमटे, शिक्षक अशोक दराडे, माजी मुख्यध्यापक भाऊसाहेब खेस्मालस्कर, विजय खोसे आदी उपस्थित होते.



# सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला नेवाशात पाठिंबा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा शहर व तालुक्यातील सुज्ञ नागरिकांच्या वतीने वद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी दिल्ली येथे उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनास नेवासा येथे जाहीर पाठिंबा देण्यात आला. त्यांच्या मागण्यांबाबत केंद्र शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी अँड.संजय सुखदान यांनी केली असून याबाबत तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांना निवेदन देण्यात आले.




निवेदनात देशातील स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षा व भरती प्रक्रियांमधील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी आणि पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि समाजामध्ये असंतोष निर्माण झाला असून परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच छएएढसह इतर राष्ट्रीय परीक्षा व भरती प्रक्रियांतील कथित गैरव्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, बाधित विद्यार्थ्यांना न्याय द्यावा आणि सोनम वांगचुक यांच्याशी सकारात्मक चर्चा करून आंदोलनाचा तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना आम आदमी पार्टीचे राज्याचे स्टार प्रचारक अॅड. संजय सुखदान, तालुकाध्यक्ष अॅड. सादिक शिलेदार, मनसेचे संतोष गव्हाणे, काँग्रेसचे रंजन जाधव यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी व शेकडो नागरिक उपस्थित होते.

# श्रीरामपूर-बेलापूर रस्ता अतिक्रमणे व दुर्लक्षाच्या विळख्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** माजी आमदार लहू कानडे यांच्या काळात चौपदरीकरण झालेला श्रीरामपूर-बेलापूर रस्ता सध्या अतिक्रमणे आणि गैरसोयींच्या विळख्यात सापडला आहे.



बायपास ते कोल्हार चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असून, रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झुडपांमुळे वाहनचालकांना वळणावर समोरून येणारी वाहने दिसत नाहीत. यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. पावसाळ्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदाराकडून जंगलकटिंग करून घेणे अपेक्षित होते, मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. रस्त्यावरील डांबरीकरण खराब होऊन खड्डे पडले आहेत. या प्रकारावर संताप व्यक्त केला असून, प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती आणि अतिक्रमण हटवण्याची कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# चिलेखनवाडी गावातील जलजीवनची कामे तातडीने पूर्ण करा : सरपंच सावंत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील भेंडा - कुकाणा सह इतर चार गावे पाणीपुरवठा योजनेतील चिलेखनवाडी गावातील जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेली अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत अशी मागणी चिलेखनवाडीचे सरपंच भाऊसाहेब सावंत यांनी केली आहे.

सरपंच भाऊसाहेब सावंत यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की केंद्र सरकारने ' हर घर जल ' हे घोषवाक्य घेऊन देशातील प्रत्येक गावातील कुटुंबाला शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे ,महिलांची पाण्यासाठीची वणवण थांबावी , जलजन्य आजार कमी व्हावेत त्यानुसार प्रति व्यक्ती ५५ लिटर पाणी दरडोई थेट नळाद्वारे कुटुंबाला दारापर्यंत देण्याचे शासनाच्या जलजीवन मिशन कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते . या योजनेत भेंडा - कुकाणा सह ४ गावे पाणीपुरवठा योजनेची दुरुस्ती व विस्ताराचा समावेश होता . या अंतर्गत चिलेखनवाडी गावासाठी गावठाण व वाड्यावस्त्यासाठी पाणीपुरवठा व नवीन पाणी साठवण टाकी मंजूर झाली होती.



परंतु सदर कामे अनेक दिवसापासून बंद आहेत.

अशी अपूर्ण कामे पूर्ण व्हावीत म्हणून सरपंच, उपसरपंच यांनी दि ७ एप्रिल २०२६ रोजी आमरण उपोषण व ग्रामस्थांचे धरणे आंदोलन केले होते. दि. ८ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेचे उपविभागीय अभियंता नेवासा यांनी सदर आंदोलन मागे घेण्यासाठी तातडीने काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले होते .

परंतु अद्यापही कामे सुरू झालेली नाहीत तरी सदर कामे तातडीने सुरू करण्यात यावी अन्यथा पुन्हा आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देण्यात आला आहे.

# श्रीरामपुरात पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

## पोलीस अधीक्षकांचा मुमक्का साधणार व्यापाऱ्यांशी संवाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर |** शहरातील वाढत्या तक्रारी, व्यापाऱ्यांना होणारा त्रास आणि कायदा-सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी पुढाकार घेत आज (शनिवार) श्रीरामपूर येथे व्यापारी, उद्योजक आणि सामान्य नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा निर्णय घेतला आहे. या संवादातून नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन तक्रारींवर तातडीने कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या काही दिवसांत व्यापारी व उद्योजकांना होणारा त्रास, महिलांच्या सुरक्षिततेबाबतच्या तक्रारी तसेच शहरातील दहशतीच्या वातावरणामुळे अनेक नागरिक तक्रार देण्यास धजावत नसल्याचे प्रकार समोर आले होते. श्रीरामपूर बंद आंदोलनादरम्यानही हे मुद्दे ठळकपणे मांडण्यात आले होते. त्यानंतर पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेत थेट संवादाची मोहीम हाती घेतली आहे.

शनिवारी सकाळी व्यापारी मंगल कार्यालयात व्यापारी व उद्योजकांशी चर्चा होणार असून त्यानंतर शहर पोलीस ठाण्यात सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या जाणार आहेत.

''ज्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास झाला असेल त्यांनी न घाबरता पुढे येऊन तक्रार द्यावी. पूर्वी दाखल झालेल्या तक्रारींचाही आढावा घेऊन आवश्यक ती कारवाई केली जाईल,'' अशी ग्वाही पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी दिली.

या बैठकीला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, शहर पोलीस निरीक्षक विशाल खैरे आणि तालुका पोलीस निरीक्षक अरुण धनवडे उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची हिमालयातील पातालसू शिखरावर यशस्वी चढाई



**संगमनेर** : अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी राजवीर सौरभ कासार आणि त्याचा लहान भाऊ राजदीप सौरभ कासार यांनी हिमालयातील १३,८९५ फूट उंचीचे पातालसू शिखर यशस्वीपणे सर केले. अवघ्या ८ वर्षांच्या राजवीरने आणि ४ वर्षांच्या राजदीपने कमी वयात हा आव्हानात्मक ट्रेक पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले, अशी माहिती अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या अंजली कन्नावार यांनी दिली. या मोहिमेद्वारे दोन्ही भावांनी साहसासाठी वय नव्हे, तर जिद्द आणि उत्साह महत्त्वाचा असतो हे सिद्ध केले असे कुटुंबीयांनी सांगितले. अशा साहसी उपक्रमांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, सहनशीलता आणि निसर्गप्रेम विकसित होते. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

### युवा नेते हर्ष तनपुरे यांची पायी दिंड्यांना सदिच्छा भेट



**राहुरी** : आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या विविध पायी दिंडी सोहळ्यांना कारखान्याचे संचालक तथा युवा नेते हर्ष तनपुरे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रवासातील अडचणींची आपुलकीने चौकशी केली. हर्ष तनपुरे यांनी संत मोरेश्वर महाराज देवस्थान (तांभेरे), पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पायी दिंडी (तमनर आखाडा), नारायण महाराज पायी दिंडी (कानडगाव), संत कवी महीपती महाराज देवस्थान (ताहाराबाद), बुबळेश्वर देवस्थान (कनगर), विठ्ठल-रुक्मिणी पायी दिंडी (आरडगाव), चंद्रगिरी महाराज देवस्थान (मांजरी), रेणुका माता देवस्थान (मानोरी), ह.भ.प. धोंगडे गुरुजी पायी दिंडी (राहुरी), अडबंगनाथ देवस्थान (भामाठाण) तसेच नारायणगिरी महाराज पायी दिंडी (वळण) आदी दिंड्यांना भेटी दिल्या. यावेळी वारकऱ्यांच्या सेवाभावातून त्यांच्या वतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. तसेच सर्व वारकऱ्यांना सुखरूप व मंगलमय वारीसाठी शुभेच्छा देत विठ्ठलाच्या चरणी सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. या प्रसंगी कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर कोळसे, गणेश गाडे, नगरसेवक नंदकुमार तनपुरे, प्रशांत डौले, नरेंद्र शिंदे,सचिन अडसुरे, चांगदेव ढोकणे यांच्यासह कार्यकर्ते व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुन्हेगारी टोळ्यांना मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा ; संजय येनपुरे यांचे आदेश

**अहिल्यानगर** : जिल्ह्यात वाढती गुन्हेगारी आणि श्रीरामपूर येथील हॉटेल व्यावसायिकाच्या खुनाच्या पार्श्वभूमीवर, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

गुन्हेगारी टोळ्यांचा कोणताही राजकीय दबाव न घेता कठोरपणे बिमोड करा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. अवैध शस्त्रे आणि टोळीवाल्यांना मदत करणाऱ्यांवर विशेष मोहीम राबवून कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. पोलिसांनी कायद्याच्या चौकटीत राहून निष्पक्ष काम करावे; कारवाई करताना कोणाचाही दबाव झुगारून द्यावा, असे सांगत, कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहू, अशी ग्वाही येनपुरे यांनी दिली. कायद्याचा धाक निर्माण करणे हेच पोलीस प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

### पुणतांबा येथील 'लिटील एंजल्स'च्या विद्यार्थिनीचे नीट परीक्षेत यश



**पुणतांबा** : राहाता तालुक्यातील पुणतांबा येथील लिटील एंजल्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु. श्रद्धा गणेश देशमाने हिने नीट या परीक्षेत ७२० पैकी ५६५ गुण मिळवून नेत्रदीपक यश संपादन केले आहेत. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. श्रद्धाच्या जिद्दीमुळे संस्थेच्या लौकिकात भर पडली असून, सर्वत्र कौतूक होत आहे.

# प्लास्टिक बंदीचा नियम धुडकावणाऱ्या व्यापाऱ्यांवर नगरपरिषदेची धडक कारवाई

## ७१ किलो प्लास्टिक जप्त, १५ हजारांचा दंड वसूल



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : केंद्र आणि राज्य शासनाच्या प्लास्टिक बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी राहूरी नगरपरिषदेने काल शहरात मोठी धडक मोहीम राबवली. मुख्याधिकारी अभिजित हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कायदेशीर कारवाई करण्यात आली. यामध्ये प्लास्टिकचा बेकायदेशीर वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करत एकूण १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, तर ७१ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले.

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्र. ऋड.ठ.५७१(ए) दि. १२ ऑगस्ट २०२१ तसेच सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार सिंगल युज प्लास्टिकच्या उत्पादन, आयात, साठवणूक, वितरण, विक्री आणि वापरावर देशात पूर्णतः बंदी आहे. याच धर्तीवर 'महाराष्ट्र प्लास्टिक व थर्मोकोल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवण) अधिसूचना' या अंतर्गत राहूरी नगरपरिषदेने ही मोहीम हाती घेतली. नगरपरिषदेच्या पथकाने आज शहरातील मुख्य बाजारपेठांसह नवीपेठ, पृथ्वी कॉर्नर आणि नगर-मनमाड रोड या परिसरातील घाऊक व किरकोळ दुकानांची अचानक तपासणी केली. यावेळी शासनाने प्रतिबंधित केलेल्या सिंगल युज प्लास्टिकचा वापर आणि साठा करणाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारण्यात आला.

मुख्याधिकारी अभिजित हराळे यांच्या नेतृत्वाखालील या धडक मोहिमेत नगरपरिषदेच्या वसुली विभाग आणि आरोग्य सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये संतोष डागवाले, बाळासाहेब पवार, गणेश यादव, सोमनाथ गायकवाड, बाळासाहेब कचरे, अनिल जाधव आदी कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष कारवाईत सहभाग घेतला. शासनाच्या प्लास्टिक बंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे. पर्यावरण रक्षणासाठी आणि राहूरी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्लास्टिक बंदी कायद्याचे सर्वांनी काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

यापुढेही ही धडक मोहीम अधिक तीव्र केली जाईल, त्यामुळे व्यापारी व नागरिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवून प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन राहुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, मुख्याधिकारी अभिजित हराळे यांनी व्यापाऱ्यांना केले आहे.

## नेवासा कृषी विभागात भ्रष्टाचाराचे आरोप; चौकशीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** : नेवासा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कारभाराबाबत गंभीर तक्रारी समोर येत असून, विविध योजनांचा लाभ देण्यासाठी पैशांची मागणी, कार्यालयीन अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे आरोप शेतकरी व विविध संघटनांकडून करण्यात येत आहेत.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तक्रारीनुसार, कार्यालयातील दुरुस्तीच्या नावाखाली बोगस बिले काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच काही कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बियाण्यांची चोरी, कृषी सेवा केंद्र चालकांकडून कथित हप्ते वसूल करणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यालयात अनियमित उपस्थिती, उशिरा हजर होणे आणि वेळेपूर्वी कार्यालय सोडणे असे प्रकार घडत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

यासंदर्भात अनेक शेतकरी संघटना व सामाजिक संघटनांनी तोंडी तसेच लेखी निवेदने देऊन संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी केली असल्याचे सांगण्यात आले. मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित अधिकारी किंवा कृषी विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

## विधाते बंधूंच्या अभंगवाणीने भक्तिरसाची अनुभूती; २९ वर्षांची अखंड परंपरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : छत्रपती संभाजीनगर येथील राम आणि बजरंग विधाते या विधाते बंधूंच्या अभंगवाणीने यंदाही आषाढी एकादशीनिमित्त भक्तिरसाचा अविस्मरणीय सोहळा अनुभवायला मिळाला. गेली २९ वर्षे वारकरी संप्रदायातील पारंपरिक भजन परंपरा जपत हे बंधू विनामूल्य अभंगसेवा करत असून, त्यांची अभंगवाणी संभाजीनगरची सांस्कृतिक ओळख बनली आहे. शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतलेल्या राम विधाते यांच्या सुरेल गायकीला बजरंग विधाते यांची समर्थ साथ लाभते. पंडित भीमसेन जोशी यांच्या गायकीचा प्रभाव असलेल्या त्यांच्या सादरीकरणामुळे श्रोते भक्तीरसात तल्लीन होतात. कार्यक्रमस्थळी विठ्ठल मंदिराचा आभास निर्माण करणारी आकर्षक सजावट, वारकरी पोशाख आणि भक्तिमय वातावरणामुळे सोहळ्याला विशेष रंग चढला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन बजरंग विधाते यांनी केले. साहित्य, कला, शिक्षण, प्रशासन व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. देवगड संस्थानाचे सद्गुरू भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने विधाते बंधू गेली अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाची सेवा करत असून त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## गरीबांना वेठीस धरून अतिक्रमणाचा प्रश्न सुटणार नाही : आ. खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने शहराचा विकास करताना सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचाही विचार करणे आवश्यक असून, गरीबांना वेठीस धरून अतिक्रमणाचा प्रश्न सुटणार नाही किंवा शहराचा विकास साधता येणार नाही, असे परखड मत आमदार अमोल खताळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. आमदार खताळ म्हणाले की, हातावर पोट असलेले अनेक नागरिक छोट्या व्यवसायाच्या माध्यमातून स्वतःचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अशा नागरिकांवर अचानक अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधितांना त्यांचे साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी पुरेसा वेळ देणे ही नगरपालिका प्रशासनाची जबाबदारी होती. मात्र कोणतीही पुरेशी मुदत न देता थेट कारवाई करण्यात आल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न सोडविणे आवश्यक असले, तरी त्यासाठी मानवी दृष्टिकोन ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. कायद्याची अंमलबजावणी करताना गरीब व सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होणार नाही, याची प्रशासनाने विशेष काळजी घेतली पाहिजे. अतिक्रमण हटविण्यापूर्वी संबंधितांना लेखी सूचना देणे, साहित्य हलविण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध करून देणे तसेच आवश्यकतेनुसार पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणे गरजेचे होते, असेही त्यांनी नमूद केले.

## डॉ. संकेत सानप यांच्या सामाजिक कार्याचा आंतरराष्ट्रीय गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील आदर्श तिगाव येथील युवा समाजसेवक, आरोग्यदूत व पत्रकार डॉ. संकेत सुमन तुकाराम सानप यांना समाजसेवा, आरोग्य, वेलनेस आणि पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दक्षिण अमेरिका-पेरूशी संलग्न आंतरराष्ट्रीय संस्थेच्या वतीने मानद डॉक्टरेट (केंमीरी ऊेंलींरींश) प्रदान करण्यात आली. या सन्मानामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या डॉ. सानप यांनी मुंबईत उपचारासाठी येणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी समन्वय आणि गरजू कुटुंबांना सातत्याने मदत करून समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेत मारवाडी गुजराती सोशल कौन्सिल व इंटरनॅशनल ऑनोरिस कॉझा अवॉर्ड कौन्सिल (खकऊ-उ) यांच्या माध्यमातून हा सन्मान प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात आरोग्य, वेलनेस, पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना 'भारत गौरव पुरस्कार' तसेच दशकभराच्या जनहिताच्या कार्यासाठी 'जीवन गौरव पुरस्कार'ही देण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सन २०२६ मध्ये विविध संस्थांकडून डॉ. सानप यांना २० हून अधिक राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ, बाळासाहेब थोरात, खासदार निलेश लंके, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार सत्यजित तांबे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रयतच्या कोल्हार विद्यालयाला माजी विद्यार्थ्याकडून ५.२१ लाखांची देणगी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार** : रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ (कला) महाविद्यालय, कोल्हार बु. (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथील माजी विद्यार्थी व उद्योजक प्रशांत बाबासाहेब कुहिले यांनी आपल्या विद्यालयाला ५ लाख २१ हजार इतकी उदार देणगी देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. विद्यालयास सदिच्छा भेटीदरम्यान मुख्याध्यापक अंकुशराज जामदार यांनी विद्यालयासाठी नवीन इमारतीची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यानंतर प्रशांत कुहिले यांनी तत्काळ ५,२१,००० रुपयांची देणगी जाहीर करून ती मुख्याध्यापक अंकुशराज जामदार, उपमुख्याध्यापक सिताराम बोरुडे आणि पर्यवेक्षिका संजीवनी आंधळे यांच्याकडे सुपूर्त केली. विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक अंकुशराज जामदार यांच्या हस्ते प्रशांत कुहिले पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनीही नवीन इमारत उभारणीसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी उदारपणे आर्थिक योगदान द्यावे, असे आवाहन केले. याप्रसंगी सचिन नेहे, शब्बीर शेख, राजेंद्र घोडके, आदिनाथ बानकर, दीपक मगर, सुधीर फुलारी, दत्तात्रय घवले, किरवे, देसाई तसेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यू/एसआर/१४७/२०२६
नेवासा दिनांक २३/०६/२०२६

अर्जदार श्री /श्रीम-संदिप मनोहरराव महिंद्रकर, रा.प्रवरा संगम, ता.नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी कै.यशोदाबाई लक्ष्मण महिंद्रकर महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला नझाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म- मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. यशोदाबाई लक्ष्मण महिंद्रकर, गावाचे नाव-प्रवरासंगम, मृत्यु दिनांक-२६/०३/२०००

करिता या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहीर प्रकटन

तमाम जनतेस विशेषतः नेवासा ता. नेवासा, जि. अहिल्यानगर परिसरातील जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नेवासा खुर्द ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथील गट नं. २३९/१ पैकी प्रशांत सुधाकर देशमुख यांचे नावावरील १ हे ९६ आर क्षेत्र, खराबा हे ०२ आर यापैकी हे ९८ आर क्षेत्र यासी चतुसिमा पुर्वेस गट नं २४१, पश्चिम गट नं. २३७, उत्तरेस गट नं. २३९/२/ब कुकरेजा यांचे क्षेत्र, दक्षिणेस प्रशांत देशमुख यांचे उर्वरित क्षेत्र. ही मिळकत आमचे अशिल यांनी खरेदी बाबत सौदा करुन विसार म्हणुन काही रक्कम अदा केलेली आहे तसेच सदर मिळकत खरेदी विक्री बाबत मिळकतीचे मुळ मालक यांनी कुटूंबातील सदस्यांसी संपुर्ण चर्चा करुन सदर मिळकत आमचे अशिलास विक्री करण्याचे एकमुखी ठरविले असुन व्यवहार निश्चीत केला आहे.

वरील संपुर्ण मिळकती बाबत, कोणाचे काही हितसंबंध, गहाण, दान, लिन, लिज, पुर्व साठेखत, विसारपावती, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जनरल मुखत्यारपत्र, तसेच रस्ता व चतुःसिमा अगर नोटराईज दस्त, करारनामा, क्षेत्र, अगर तत्सम स्वरुपाचे दस्तऐवज तसेच मिळकती संबंधी काहीही आर्थिक देणे, घेणे, बँका, पतसंस्था, अगर वित्तीय संस्थेचे असलेले कर्ज, तसेच, हरकती, न्यायालयीन वाद अगर स्थगिती, हुकूमनामा प्रलंबित दावे, काही हरकती तक्रारी असल्यास हे जाहीर प्रकटन प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत आमचे कार्यालयात समक्ष अथवा लेखी स्वरुपात खुलासा सादर करावा, मुदतीत खुलासा/म्हणने प्राप्त न झाल्यास सदर मिळकती बाबत कोणाचे काही एक हितसंबंध व देणे घेणे, म्हणने, हरकती, तक्रारी नाही असे समजुन आमचे अशिल उपरोक्त मिळकतीचे कायम खरेदीखत मुदतीत अधिकृत दुय्यम निबंधक कार्यालय येथे नोंदवुन घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकतीं, तक्रारींचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी, सदरचे जाहीर प्रकटन माहितीस्तव प्रसिध्द केले असे.

ठिकाण :- नेवासा
दिनांक :- १७.०७.२०२६

**अभिजित एन. पाटील ॲडव्होकेट,**
**जिल्हा व सत्र न्यायालय नेवासा,**
**ता. नेवासा, जि. अहिल्यानगर,**
**मो.नं. ९५०३७९२५५५**

# स्टंटबाजी करून शहराची प्रतिमा मलिन करण्याचा विरोधकांचा डाव

## 'भिक मांगो' आंदोलनावर नगराध्यक्ष कदम यांचा हल्लाबोल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नगरपरिषदेच्या कामकाजाविरोधात विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या भिक मांगो आंदोलनावर नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार सर्वांना असला तरी अशा आंदोलनांमुळे देवळाली प्रवराची प्रतिमा मलिन होत असून स्वतःची प्रसिद्धी मिळविण्यासाठी स्टंटबाजी करून शहराची बदनामी करण्याऐवजी विकासासाठी सहकार्य करण्याची गरज आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे नगराध्यक्ष कदम यांनी सांगितले की, नगरपरिषदेचा कार्यभार स्वीकारून अवघे सहा महिने झाले आहेत. या काळात नगरपरिषदेवर वार्षिक उत्पन्नाच्या जवळपास चारपट आर्थिक देणी असल्याचे समोर आले. ठेकेदारांची थकीत बिले, पुरवठादारांची देणी, रखडलेली विकासकामे आणि काही वेळा कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याचीही अडचण अशी गंभीर परिस्थिती होती.

तरीही उपलब्ध निधीचे योग्य नियोजन करून नागरिकांना अत्यावश्यक सेवा पुरविण्यावर भर देण्यात आला आहे. राज्यात आमचे सरकार असून देवळाली प्रवरासाठी जास्तीत जास्त निधी मिळविण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. पाणीपुरवठा, रस्ते, स्ट्रीट लाईट, भूमिगत गटार योजना आणि



इतर विकासकामांचे अनेक प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या नियमित पाणीपुरवठा, बंद पडलेल्या स्ट्रीट लाईटची दुरुस्ती, खराब रस्त्यांची डागडुजी आणि स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य जलवाहिनी फुटणे, एअर व्हॉल्व्हमधील गळती तसेच काही ठिकाणी जाणूनबुजून होणारी तोडफोड यामुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

काही नागरिकांनी घरगुती नळजोडण्यांवर अनधिकृत मोटारी बसविल्यामुळे इतर भागांना कमी दाबाने पाणी मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.शनिवारी पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय शासनाच्या पाणीबचत धोरणानुसार आणि नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार घेण्यात आला होता. त्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स

ट्रीट लाईट आणि रस्त्यांच्या कामांबाबत बोलताना, आवश्यक साहित्य उपलब्ध झाल्यानंतर बंद दिवे सुरू करण्याचे, नवीन एलईडी दिवे बसविण्याचे आणि खराब रस्त्यांची दुरुस्ती सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कायमस्वरूपी दर्जेदार रस्त्यांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविले असून त्यांना लवकरच मंजुरी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधकांच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, विधायक टीकेचे स्वागत आहे; मात्र अपूर्ण माहितीच्या आधारे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करणे आणि शहराची बदनामी करणे योग्य नाही.

नगरपरिषदेच्या कामकाजाला विकासकामांतूनच उत्तर दिले जाईल, असे कदम यांनी म्हंटले आहे. दिंडी काळातील पाणीपुरवठ्याबाबतही कदम यांनी खुलासा करून त्या दिवशी नगरपरिषदेचे कर्मचारी पूर्वनियोजित कामांवर नियुक्त होते आणि उपलब्ध सर्व टँकर पंढरपूर पायी दिंडीसाठी कार्यरत होते. तरीही दिंडीसाठी सुमारे ३५ ते ४० टँकर भरून देण्यात आले. नागरिकांनी स्वतःचा टँकर आणल्यास त्यालाही पाणी भरून देण्याची तयारी नगरपरिषदेने ठेवली होती.

नागरिकांनी अफवा व अपप्रचारावर विश्वास न ठेवता थेट नगरपरिषदेकडून माहिती घ्यावी आणि विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी केले.

## पान १ वरुन

### अहिल्यानगर जिल्ह्यातील धरण साठ्यात १५ टीएमसीची तूट

राज्यात आतापर्यंत सर्वात कमी पाऊस अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथे अवघा ९२ मिमी नोंदविण्यात आला असल्याचेही चकोर यांनी सांगितले.येत्या काळात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज लक्षात घेता, पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने प्रशासनाने सप्टेंबरअखेरपर्यंत तसेच आवश्यक असल्यास त्यानंतरही नियोजन कायम ठेवणे गरजेचे असल्याचे मत निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी व्यक्त केले.

### हृदय जपणारा डॉक्टर... स्वत:चं मन वाचवू शकला नाही!

त्यामुळे त्यातील संदेश, शेवटचे कॉल, वैयक्तिक नोंदी किंवा अन्य डिजिटल पुरावे तपासासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.डॉ. मेहुल राठोड यांच्या मृत्यूमुळे केवळ एका नामवंत डॉक्टरचा अंत झालेला नाही, तर 'यशस्वी माणूसही आतून तुटू शकतो' हा समाजासाठी गंभीर इशारा समोर आला आहे. मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलण्याची आणि तणावात असलेल्या व्यक्तींना वेळेवर आधार देण्याची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे.

### 'महेश ट्युटोरियल्स'ने गाशा गुंडाळला देशभरातील शाखा बंद

मुंबईतील विद्यार्थ्यांना अरिहंत ॲकॅडमीमध्ये सामावून घेण्याची तयारी दर्शविण्यात आली असली, तरी शुल्क परतावा आणि पुढील शिक्षणाबाबतची अनिश्चितता कायम आहे. दरम्यान, कंपनीवर सुमारे ३२.३३ कोटी रुपयांचे थकीत कर्ज असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच ३० सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या लेखापरीक्षणात आर्थिक अनियमिततांबाबत गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले होते. दिवाळखोरी प्रक्रियेमुळे संस्था बंद करण्यात आल्याचे सांगितले जात असून, हजारो विद्यार्थी व पालकांचे भवितव्य आता टांगणीला लागले आहे.

### जयंत पाटील उजव्या वळणावर...

यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा घेऊन पुढे चालणारे खंबीर नेतृत्व आहे. इतकेच नव्हे तर, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय आणि सामाजिक वारसा घेऊन पुढे जाणारे ते नेते आहेत. त्यामुळे पाटील साहेब महायुतीसोबत जाण्याचा असा कोणताही निर्णय घेतील, असे मला वाटत नाही. ते पुढे म्हणाले की, आम्हा सगळ्यांना माहिती आहे की आत्ताचा काळ कठीण आहे, पण हा कठीण काळ देखील निघून जाणार आहे. २०२९ ला राज्याच्या राजकारणात नक्की बदल होईल याची आम्हा सगळ्यांना पूर्ण खात्री आहे. त्यामुळे आम्ही सगळेजण ताकतीने एकत्र राहू आणि जयंत पाटील साहेब देखील शाहू, फुले, आंबेडकर यांचा विचार घेऊनच आमच्या सोबत राहतील, याची मला खात्री आहे, असा विश्वास सतेज पाटील यांनी व्यक्त केला. राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर बोलताना सतेज पाटील यांनी सरकारच्या हेतूवर शंका उपस्थित केली. ते म्हणाले, एककीडे सरकार सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केल्याचे सांगते, आणि दुसरीकडे मात्र त्यासाठी अनेक जाचक अटी लावल्या जातात. अटी लावायच्या असतील तर त्याला 'सरसकट' कसे म्हणता येईल? या सरकारच्या केवळ घोषणा आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यात खूप मोठी 'मिसिंग लिंक' आहे. शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नांना हात घालताना त्यांनी वीज बिल सवलतीवरही बोट ठेवले. शेतकऱ्याच्या नावाखाली तिकडे वीज कंपन्यांकडे भ्रष्टाचाराचे पैसे जाऊ नयेत, असे आम्हाला वाटते. याशिवाय एमपीएससी परीक्षा ऑनलाईन करावी अशी मागणी आम्ही लावून धरली होती, परंतु हे सरकार सर्वच प्रश्नांचा विचका करण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

# ॲग्रीस्टॅक नोंदणीशिवाय शासकीय लाभ मिळणार नाहीत

## उर्वरित १९ हजार शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करावी : तहसीलदार धीरज मांजरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी ।** संगमनेर तालुक्यातील एकूण १ लाख ५ हजार शेतकऱ्यांपैकी ८६ हजार शेतकऱ्यांनी 'ॲग्रीस्टॅक' नोंदणी पूर्ण केली असून, अद्याप १९ हजार शेतकरी नोंदणीपासून वंचित आहेत. यापुढे कृषी विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत मिळणाऱ्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ॲग्रीस्टॅक' क्रमांक अनिवार्य असणार असल्याने उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार धीरज मांजरे यांनी केले.

आश्वी बुद्रुक येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान समाधान शिबिरात' ते बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्यासह महसूल व पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहसीलदार मांजरे यांनी सांगितले की, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांची संयुक्त पाहणी करून २०११ पूर्वीचे पुरावे असलेल्या पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार जमिनीचे पट्टे दिले जाणार आहेत. तसेच पोट-खराबा क्षेत्र वहितीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांनी महसूल विभागाकडे अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी केले.



पीक पाहणीसाठी नवीन डिजिटल प्रणाली लागू होत असून, गावपातळीवरील स्वयंसेवक शेतात जाऊन पिकांची नोंद करणार आहेत. नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानभरपाईसाठी पीक पाहणीची नोंद आणि ॲग्रीस्टॅक क्रमांक बंधनकारक राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'बळिराजा शेत पांदण रस्ते योजना' अंतर्गत शेतरस्त्यांचे मुरुमीकरण व खडीकरण करण्यात येणार असून, अडथळा आणणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.यावेळी विविध शासकीय योजनांच्या मंजुरीपत्रांचे व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांनी ऊसाबरोबरच फळबाग लागवडीकडेही वळावे, असे आवाहन केले.

## महालक्ष्मी हिवरे येथे नवनिर्वाचित संचालकांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदी महालक्ष्मी हिवरे येथील एकनाथ जगताप व माका येथील लक्ष्मन अबा पांढरे यांची माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल म.ल. हिवरे ग्रामस्थांच्या वतीने नुकतेच सन्मान सोहळ्याचे आयोजन खंडोबा मंदिर येथे करण्यात आले होते.

खंडोबा मंदिर या ठिकाणी दर अमावस्येला आमटी भाकरी महाप्रसादाचे आयोजन केले जाते याचे औचित साधून एकनाथ जगताप, लक्ष्मन अबा पांढरे या दोन संचालकांचा व उध्दव




मोरे यांची केंद्र प्रमुख म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल यांचा उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी खंडोबा मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोक केदार उपअध्यक्ष पप्पु गायके सचिव सोमनाथ पालवे महालक्ष्मी हिवरे सोसायटीचे माजी चेअरमन राजेंद्र गायके, जगन्नाथ गायके, निवृती सानप, ऊध्दव सानप, दत्तात्रय सांगळे, विलास बोरुडे, भाऊसाहेब सानप, भारत पालवे, गोरक्षनाथ जगताप, शिवाजी पालवे, बबन गायके, दत्तात्रय सानप, महादेव गायके, सलीम शेख, विक्रम सानप, मेजर अशोक सानप, सुत्र संचालन व आभारप्रदर्शन कैलास आव्हाड यांनी केले याप्रसंगी अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिवना नदीपात्रातून होणारी अवैध वाळू तस्करी उधळली १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील शिवना नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू तस्करीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. लासूरगाव शिवारात अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून पोलिसांनी एकूण १४ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

शिवना नदीपात्रातून दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असल्याची माहिती वैजापूर पोलिसांना मिळाली होती. महसूल प्रशासनाचे निर्बंध झुगारून काही जण पर्यावरणाचा ऱ्हास करत वाळूची अवैध विक्री करत होते. या माहितीची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी अजित नाचन, प्रशांत गीते आणि त्यांच्या पथकाने लासूरगाव परिसरात सापळा रचला.

बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास वाळूने भरलेले दोन ट्रॅक्टर (क्रमांक चक ५७-२९९४ आणि चक २० ऋष-७८०४) पोलिसांना संशयास्पदरीत्या जाताना दिसले. पथकाने दोन्ही ट्रॅक्टर अडवून चालकांची विचारपूस केली.

चौकशीदरम्यान चालकांनी आपली नावे गणेश जाधव आणि विक्रम साळुंके अशी सांगितली. पोलिसांनी त्यांच्याकडे वाळू वाहतुकीचे परवाने, रॉयल्टी पावती किंवा इतर कायदेशीर कागदपत्रांची मागणी केली. मात्र, चालकांकडे कोणतीही कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. ही वाहतूक पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे सिद्ध होताच पोलिसांनी दोन्ही ट्रॅक्टर आणि त्यातील वाळू असा एकूण १४ लाख १६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध अवैध गौण खनिज वाहतुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस




करत आहेत.

शिवना नदीपात्रातून होणाऱ्या अनिर्बंध वाळू उपशामुळे नदीचे पात्र खोल होऊन नैसर्गिक स्वरूप बदलत आहे. यामुळे भूजल पातळी खालावण्यासोबतच नदीकाठच्या शेतीला, पुलांना आणि बंधाऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी यापूर्वीही या तस्करीबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या.पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांचे कंबरडे मोडले असून, भविष्यातही अशा प्रकारची कठोर कारवाई सुरूच राहील, असे पोलीस सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

## निधन वार्ता

### रामकृष्ण गायकवाड



**नेवासा :** तालुक्यातील प्रवरा संगम येथील प्रगतशील शेतकरी रामकृष्ण अर्जुन गायकवाड (वय ६५) यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली ,एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार असून श्रीराम उद्योग समूहाचे राजेंद्र गायकवाड यांचे वडील तर विश्व हिंदू परिषदचे गजानन गवारे यांचे सासरे व ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब काळे यांचे मेहुणे होत.

## निधन वार्ता

### कमल दिघे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** सुखकर्ता कॉलनी, रेल्वे ब्रीज येथील रहिवासी कमल विश्वनाथ दिघे (वय ८५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे. नवोदय विद्यालय, कन्नडचे शिक्षक राजेश विश्वनाथ दिघे व स. म. शिवाजीराव नागवडे साखर कारखान्याचे निवृत्त कोजन मॅनेजर संजय विश्वनाथ दिघे व मनसेच्या महिला जिल्हाध्यक्षा व कौटुंबिक न्यायालयाच्या उपाध्यक्षा ॲड. अनिता विश्वनाथ दिघे यांच्या त्या आई होत्या.

### दत्तात्रय आरंगळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपुर :** राहुरी तालुक्यातील करजगाव येथिल जुन्या पिढीतील दत्तात्रय कोंडाजी आरंगळे (वय ८१) वर्ष यांचे अल्पाशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, तिन मुली, सुन, जावई, पुतणे आसा परिवार आहे. प्रवरा शिक्षण संस्थेचे शिक्षक ज्ञानेश्वर आरंगळे यांचे वडील होत.

### बेबीताई पवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** राहुरी तालुक्यातील धामोरी बुद्रुक येथील भाऊसाहेब कारभारी पवार यांच्या पत्नी कै. बेबीताई भाऊसाहेब पवार यांचे अल्पशा आजाराने दु:ख निधन झाले (वय ६५ )त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंड असा परिवार आहे.

### गंगाराम गवारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगांव येथील गंगाराम काशिनाथ गवारे (वय ५५) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, मुलगा सुन असा परिवार असून विश्व उद्योग समुहाचे व्यवस्थापक गणेश गवारे यांचे ते वडील होत.

## न्यायालयात तारखेवर हजर न राहणाऱ्या २७ जणांना अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** न्यायालयाच्या तारखेला वारंवार गैरहजर राहत असल्याने वॉरंटधारकांविरोधात गंगापूर पोलिसांनी धडक मोहीम राबवत पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत ३५ न्यायालयीन वॉरंटधारकांपैकी तब्बल २७ आरोपींना ताब्यात घेऊन न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

गंगापूर तसेच छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगर येथील न्यायालयांमध्ये विविध गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी संबंधित आरोपींना वारंवार हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष करून हे आरोपी गैरहजर राहत असल्याने न्यायालयाने त्यांच्या विरोधात अटक वॉरंट बजावले होते.

या वॉरंटची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस




निरीक्षक सलीम चाऊस, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक पाटील, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल झांजुर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने पहाटेपासूनच विविध ठिकाणी छापेमारी करत आरोपींचा शोध घेत त्यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून, उर्वरित ८ वॉरंटधारकांचा शोध अद्याप सुरू आहे.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक पाटील, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल झांजुर्णे, युसुफ पठाण, पोलीस हेडकॉन्स्टेबल अमित पाटील, रमेश जारवाल, विजय पारखे, गोपनीय शाखेचे मनोज नवले, मनोज घोडके, पोलस नाईक विठ्ठल जाधव तसेच पोलीस कॉन्स्टेबल संदीप घुसंगे, अनिरुद्ध शिंदे, अमोल करवंदे, नारायण दुल्हन, विष्णू बापते, अश्विनी गायकवाड आणि रेणुका धारकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

''कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही'' – पोलीस निरीक्षक सलीम चाऊस

''न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कायदेशीर कर्तव्य आहे. न्यायालयाने दिलेल्या तारखेला जाणूनबुजून गैरहजर राहणाऱ्या आणि वॉरंट प्रलंबित असलेल्या व्यक्तींविरुद्ध गंगापूर पोलीस सातत्याने कारवाई करत राहतील. ज्यांच्याविरुद्ध न्यायालयीन वॉरंट आहे त्यांनी स्वत:हून न्यायालयात हजर राहून वॉरंट रद्द करून घ्यावे. अन्यथा त्यांना शोधून अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात येईल. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही आणि न्यायालयीन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गंगापूर पोलीस कटिबद्ध आहेत.''

## वारंवार होणाऱ्या वीज कपातीने नागरिक, शेतकरी झाले हैराण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ममदापूर राहाता :** ममदापूर येथील ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्रावर सध्या मोठ्या प्रमाणात अतिरिक्त भार पडत असल्याने परिसरातील गावांमध्ये वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत. सततच्या अनियोजित भारनियमनामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि लघुउद्योजक मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सध्या खरीप हंगाम जोरात सुरू असल्याने शेतीला पाण्याची नितांत गरज आहे. मात्र, वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. मोटारी चालवण्यासाठी पुरेसा दाब मिळत नसल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दिवसभरात अनेक वेळा वीज जात असल्याने घरगुती कामांसह लहान उद्योगांचे उत्पादन आणि दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले आहेत. दुकानांमधील कामकाजावरही याचा विपरीत परिणाम होत आहे, तर दुसरीकडे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचीही मोठी गैरसोय होत आहे.नागरिकांनी महावितरण प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. उपकेंद्राची क्षमता वाढवून अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविणे आणि नियमित व सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणी जोर धरत आहे.

महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेऊन वीज समस्येचे निराकरण न केल्यास, नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

### पाहिजेत

पुणतांबा (ता. राहाता ) येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेत त्वरित पदे भरणे आहेत. शाखाधिकारी एक, कॉशियर एक, क्लार्क एक, असे कर्मचारी त्वरित भरावयाचे आहे. तरी अनुभव असलेल्या इच्छूक उमेदवारांनी (दि.२७) जुलै २०२६ पर्यंत बाजारपेठ रोड पुणतांबा (ता. राहाता) येथील या संस्थेत इच्छूकांनी संपर्क साधावा.

### Change in Name

I declaire that I have changed my name from **Priti Yosef Wadagale** to new name is **Priti Yoseph Wadagale** against Maharashtra Government Gazzet **Reg. No. M-2631679**

# नगर जिल्ह्यातील तरुणाची थरारक हॉरर शॉर्ट फिल्म ''चकवा'' आज प्रदर्शित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगर जिल्ह्यातील तरुण दिग्दर्शक डॉ. राहुल वाडकर यांची ''चकवा'' ही हॉरर शॉर्ट फिल्म सध्या प्रेक्षकांमध्ये उत्सुकतेचा विषय ठरत आहे. एका सत्य घटनेवर आधारित असलेली ही फिल्म अंगावर काटा आणणारा थरार, रहस्य आणि उत्कंठा यांचा सुरेख संगम असल्याचे प्रीव्ह्यू पाहिलेल्या प्रेक्षकांकडून सांगितले जात आहे.या चित्रपटाची कथा, पटकथा, निर्मिती आणि दिग्दर्शन डॉ. राहुल वाडकर यांनी केले असून, मराठी हॉरर चित्रपटसृष्टीत वेगळा ठसा उमटवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

चित्रपटात रिलस्टार सोनु यामजाल,रिलस्टार राहुल वाडकर,लखन वाडकर,डॉ. विकी मोरे,प्रथमेश मुंडे, गौरव गरड,




अनिकेत चौधरी, अर्जुन गोंडे आणि आर्यन गोर्डे यांनी प्रभावी व चित्तथरारक अभिनय साकारला आहे. चित्रपट इतका खिळवून ठेवणारा आहे की ''फिल्म कधी सुरू झाली आणि कधी संपली हेच कळत नाही; अजून थोडी पाहायला मिळाली असती तर!'' अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली आहे. याचे श्रेय सर्व कलाकारांच्या उत्कृष्ट अभिनयासह दिग्दर्शक डॉ. राहुल वाडकर यांच्या मेहनतीला दिले जात आहे.

चित्रपटाचे डीओपी प्रवीण मिसाळ यांनी आपल्या प्रभावी छायाचित्रणातून प्रत्येक दृश्य अधिक भयावह आणि वास्तवदर्शी बनवले आहे. तर या हॉरर शॉर्ट फिल्मचे गीत व संगीत महाराष्ट्राचे नामवंत गायक अविनाश वाडकर यांनी दिले असून संगीतामुळे चित्रपटातील थरार अधिक प्रभावी झाला आहे. ही बहुप्रतीक्षित हॉरर शॉर्ट फिल्म १८ जुलै रोजी रात्री ९ वाजता ''अअठअृकअछअ ठएउजठृड'' या यूट्यूब चॅनलवर प्रदर्शित होणार आहे. या निमित्ताने निर्माते व कलाकारांनी महाराष्ट्रातील सर्व रसिक प्रेक्षकांना ही फिल्म आवर्जून पाहण्याचे आणि मराठी कलावंतांना भरभरून पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .१८ जुलैं २०२६'

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२० ३४६ ३३७ | ३-९ | १३० २७० १२५ | ३२-६९-१५-०४-९८ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९ ४८० ६६० | २-७ | १२४ ४६७ ३४० | २६-०७-८१-९५-७६ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ २२८ | ९०-५२-१६-३७-२८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 230 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 585 | 358 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 139 | 199 96 330 | 258 59 559 |

# द•ख•ल

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंब्यासाठी मौन कॅण्डल मार्च



**अहिल्यानगर :** विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी शांततामय व लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी तसेच केंद्र सरकारने त्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी नगरमध्ये शुक्रवारी मौन कॅण्डल मार्च काढण्यात आला. याचे प्रारंभ वाडियापार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन करण्यात आले. या मार्चमध्ये युवक-युवतींसह सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## दहेश्वर विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा



**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव. आज विद्यालयात शिक्षक पालक मेळावा घेण्यात आला या मेळाव्याचे अध्यक्ष नंदु पा भोसले होते. मेळाव्याचे प्रास्ताविक वाघमारे यशोदास यांनी केले शिक्षक पालक संघ स्थापन करण्याचा उद्देश समजावून सांगितला विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, गुणात्मक विकास व विद्यार्थी समस्या सोडविण्यासाठी शिक्षकां बरोबर पालकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. या वेळी सर्वानुमते शिक्षक- पालक संघ स्थापन करण्यात आला अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले सर उपाध्यक्ष पालकांतून आनंद गांधी यांची निवड करण्यात आली. सचिव वाघमारे प्रत्येक वर्गाचे वर्गशिक्षक व पालक यांची सदस्य म्हणून एक वर्षासाठी निवड करण्यात आली. याप्रसंगी पालक भोसले दादासाहेब, कनगरे ज्ञानेश्वर, शेळके गणेश, दळे लहू, दळवी अंबादास, भोसले नंदु, सामाजिक कार्यकर्ते शिंदे बाळासाहेब, गांधी आनंद, गायकवाड भिमराज, कांबळे अशोक, काटे अशोक, वाघमोडे विठ्ठल, अवारे लक्ष्मण, श्रीमती भारती गटात, श्रीमती फुंदे मावशी, संरपच सौ सविता शिंदे, हे पालक उपस्थित होते विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक तुपविहिरे बाळासाहेब, जाधव रणजित, बर्डे भाऊसाहेब, विशाल जोशी, बोडखे प्रमिला मॅडम, वाघमारे यशोदास, व्यवहारे विकास लिंभोरे राजाराम, आरगळे देविदास उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सरांनी केले आणि आभार व्यवहारे सरांनी व्यक्त केले.

## मुख्यमंत्री शेत पानंदरस्ता क्षेत्रीय समितीच्या अध्यक्षपदी वैभव खलाटे



**शिराळ चिचोंडी :** राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री शेत पानंदरस्ता क्षेत्रीयसमितीच्या अध्यक्षपदी पाथर्डी तालुका मार्केट कमिटीचे संचालक वैभवजी खलाटेयांची प्रशासकीय पातळीवर निवड करण्यात आली आहे शेत पानंदरस्त्याचे महत्त्व शेतकऱ्यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा विषय मानला जात असून राज्य सरकारने देखील या समितीच्या माध्यमातून शेतकऱ्याची रस्त्याचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले आहे आणि याचाच एक भाग म्हणून या क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून शेतकऱ्याचे प्रश्न सोडवले जाणार आहे त्याचबरोबरपानद रस्त्यासाठी राज्य सरकारकडून कोट्यावधीचा निधी देखील दिला जाणार आहे राहुरी नगर पाथर्डी विधानसभा क्षेत्रीय समितीच्या अध्यक्षपदी वैभव खलाटे यांची निवड झाल्यानंतरत्यांचा सन्मान या मतदारसंघाचे आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आला आहे. यावेळी बाळासाहेब अकोलकर, पुरुषोत्तम आठरे, संतोष शिंदे,सचिन दुसंगे, हनुमंतराव घोरपडे, भाऊ आव्हाड, अमोल घोरपडे, शरद मुळे, डॉ. रामेश्वर गीते, तुकाराम कुमावत, रमेश पाथरकर, विलास मुखेकर, मोहन चोथे, बाबाजी पालवे, किशोर पालवे, आनंदा शिरसाट यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मार्ग' नाव देण्याची मागणी



**अहिल्यानगर :** सारसनगर येथील बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला 'बालब्रह्मचारी सद्गुरु सिदाजी आप्पा मार्ग' असे नामकरण करण्यात यावे, तसेच धरती चौक ते परशुराम खुंट या रस्त्यास माजी नगरसेवक स्व. आप्पासाहेब भाऊसाहेब हरबा यांचे, तर हातमपुरा ते नालबंद खुंट या रस्त्यास माजी नगरसेवक स्व. गोपीनाथ भिकाजी मिसाळ यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या वतीने करण्यात आली. या मागणीसंदर्भात महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संतोष गेन्नाप्पा, सतीश हरबा, गोविंद मिसाळ, चंद्रकांत औशीकर, विष्णू कलागते, सटवाजी गेन्नाप्पा, पैलवान सतीश हरबा, आप्पासाहेब बारसे, संतोष उन्हाळे, शंकरराव पंगुडवाले, मोहन हिरणवाळे, विशाल भागानगरे, लंकेश काटकर, ओंकार हरबा, योगेश मिसाळ, रमेश मिसाळ यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेमध्ये तल्लीन होऊन खेळताना खेळाडू.

# गायरान जमिनीवरील पारधी कुटुंबांना हक्क द्या

## जमीन सौर प्रकल्पासाठी देऊ नका



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव येथील आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबांनी अनेक वर्षांपासून गट क्रमांक ६६२ मधील दोन हेक्टर गायरान जमिनीवर केलेले अतिक्रमण कायमस्वरूपी करून संबंधित कुटुंबांची नावे सातबारावर नोंदवावीत तसेच जातीचे दाखले व ओळखपत्र राज्य अभियान योजनेअंतर्गत मिळावे तसेच जमीन कोणत्याही सौर ऊर्जा कंपनीला अथवा इतर खाजगी प्रकल्पासाठी देऊ नये, अशी मागणी आदिवासी पारधी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र काळे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी दीपक काळे, अविनाश काळे, रोहित काळे, आनप काळे, विकास काळे, ज्योती काळे यांच्यासह पारधी समाजातील कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शेडगाव येथील पारधी समाजातील अनेक कुटुंबांनी उदरनिर्वाह व निवासाच्या गरजेतून सन १९७५ पासून गायरान जमिनीवर वास्तव्यास सुरुवात केली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील चांडगाव गट क्रमांक ६२२ मधील महाराष्ट्र शासनाच्या जमिनीवर त्यांनी ताबा घेऊन वास्तव्यासह उपजीविकेची साधने उभी केली आहेत. मात्र आजही या कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, सामाजिक संरक्षण व इतर मूलभूत अधिकारांपासून वंचित राहावे लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शासनाचे विविध निर्णय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतरही काही कुटुंबांना अतिक्रमण हटविण्याबाबत सूचना दिल्या जात असल्याने त्यांच्यावर बेघर होण्याची भीती निर्माण झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही जमीन पारधी समाजाच्या कुटुंबांच्या वास्तव्यास व उदरनिर्वाहासाठी वापरात असल्याने ती कोणत्याही सौर ऊर्जा कंपनी, खाजगी संस्था किंवा इतर प्रकल्पासाठी हस्तांतरित करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच या कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत व कायदेशीर हक्कांबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत जमीन हस्तांतरण, संपादन किंवा बेदखल करण्याची कोणतीही कारवाई करू नये, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## अनाथ मुलीला दत्तक घेऊन सहस्त्रबुद्धेंचा आदर्श

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** केडगाव येथील स्नेहांकुर दत्तक विधायक केंद्रात आयोजित करण्यात आलेला कन्या दत्तक सोहळा अत्यंत भावनिक आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. सागर सहस्त्रबुद्धे आणि कीर्ती सहस्त्रबुद्धे या दाम्पत्याने चिमुकली दिव्या हिला दत्तक घेत तिच्या आयुष्यात आई-वडिलांच्या प्रेमळ नात्याचा सहवास दिला. या निर्णयामुळे सहस्त्रबुद्धे कुटुंबासाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला असून उपस्थितांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू दाटून आले.



समाजात मुलींबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासोबतच अनाथ बालकांना प्रेमळ कुटुंब मिळावे, या भावनेतून झालेला हा दत्तक सोहळा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. एका अनाथ चिमुकलीला आपलेसे करून सहस्त्रबुद्धे दाम्पत्याने मानवतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजासमोर उभा केला.

यावेळी महावीर ग्रुपचे उद्योजक राजेश भंडारी म्हणाले की, मुली आज शिक्षण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा आणि संरक्षण क्षेत्रासह प्रत्येक क्षेत्रात यशाची नवी शिखरे गाठत आहेत. देशाच्या जडणघडणीत आणि प्रगतीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

अशा परिस्थितीत एका अनाथ मुलीला दत्तक घेऊन तिच्या आयुष्याला नवे वळण देण्याचा सागर व कीर्ती सहस्त्रबुद्धे यांचा निर्णय समाजासाठी आदर्शवत आहे.

## ऊसतोडणी मजुरांच्या शोषणाविरोधात २४ जुलैला आंदोलन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** ऊसतोडणी मजुरांवरील आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक शोषणाविरोधात संघटित जनलढा उभारण्याचा निर्धार पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'ऊसतोडणी मजूर गुलामी व शोषणविरोधी आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ ड. कारभारी गवळी आणि अशोक सब्बन यांनी दिली.

ऊसतोडणी मजूर हे बहुतांश गरीब, अशिक्षित, स्थलांतरित आणि असंघटित कुटुंबांतील असतात. मुकादम, ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदार आणि काही साखर कारखान्यांच्या व्यवस्थेमुळे अनेक मजूर कर्ज, आगाऊ रक्कम आणि एकतर्फी करारांच्या जाळ्यात अडकतात. ऊसतोडणीचा हंगाम सुरू झाल्यानंतर त्यांच्याकडून अत्यंत कष्टाचे काम करून घेतले जाते. मात्र योग्य मजुरी, सुरक्षित निवास, आरोग्यसेवा, अपघात विमा, महिलांची सुरक्षितता, मुलांचे शिक्षण आणि कायदेशीर संरक्षण यांकडे गंभीर दुर्लक्ष केले जाते. काही भागांत मजुरांना धमकावणे, त्यांच्या हालचालींच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणे, कुटुंबीयांना भीती दाखवणे किंवा बळजबरीने काम करून घेणे, अशा घटना व आरोप समोर येत आहेत. काही प्रकरणांत मजुरांना जबरदस्तीने दुसऱ्या ठिकाणी नेल्याच्याही तक्रारी करण्यात आल्या आहेत. अशा प्रत्येक तक्रारीची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता, बंधमजुरी पद्धती (निर्मूलन) अधिनियम, बालमजुरीविरोधी कायदे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ॲड. गवळी यांनी केली. भारतीय संविधानातील अनुच्छेद २३ मानव तस्करी, वेठबिगारी आणि अन्य प्रकारच्या जबरदस्तीच्या मजुरीस प्रतिबंध करतो. तसेच बंधमजुरी पद्धती (निर्मूलन) अधिनियम, १९७६ नुसार बंधमजुरीची पद्धत बेकायदेशीर ठरविण्यात आली आहे.

## उडान फौंडेशनचा सांस्कृतिक सोहळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** उडान फाउंडेशनच्या माध्यमातून १५ ऑगस्ट रोजी शहरातील टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सांस्कृतिक व विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देशभक्तीवर गीते, देशभक्ती गीतांवरील नृत्य स्पर्धा, महाराष्ट्राची लोकधारा सादरीकरण अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण, साहित्य, संस्था, उद्योजक, क्रीडा, योगा आदींमध्ये हिरारीने सातत्याने परिश्रमपूर्वक कार्य करणाऱ्या व्यक्तींना आणि युवकांना राज्यस्तरीय उडान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविले जाणार आहे. या पुरस्कारासाठी व्यक्ती परिचय, केलेल्या कार्याची माहिती, फोटो, वर्तमानपत्रातील कार्यक्रमाचे कात्रणे ३० जुलैपर्यंत प्रस्ताव स्वरुपात पाठविण्याचे आवाहन उडान फाउंडेशनच्या अध्यक्षा ड. आरती शिंदे यांनी केले आहे.

आरती शिंदे, आगडगाव, रतडगाव (ता. अहिल्यानगर) या पत्त्यावर प्रस्ताव पाठविण्याचे म्हंटले आहे. ३० जुलै प्रस्ताव पाठविण्याची शेवटची तारीख आहे. उशीरा आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. पुरस्कारासाठी आलेल्या प्रस्तावाची छाननी केली जाणार असून, निवड समितीमध्ये ड. प्रशांत साळुंके, प्रा. सुनील मतकर, मेजर भीमराव उल्हारे, जयश्री सोनवणे, डॉ. ईसा शेख, ड. दिनेश शिंदे, जयश्री शिंदे, मीना म्हसे, शिवाजी नवले, डॉ. रमेश वाघमारे आदींचा समावेश आहे.

## व्यवसाय परवाना शुल्कात १६०% वाढीचा प्रस्ताव

## शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे गरजेचे : काळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेकडून व्यवसाय परवाना शुल्कात तब्बल १६० टक्के वाढ करण्याचा महासभेच्या मंजुरीसाठी प्रशासना कडून सादर करण्यात आलेला प्रस्ताव अत्यंत अन्यायकारक असून दुकानदार, छोटे किरकोळ विक्रेते, व्यापारी विरोधी आणि जनविरोधी आहे. या प्रस्तावाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा तीव्र जाहीर विरोध आहे. पाशवी बहुमता सह एकहाती सत्ता दिल्याचा हा दुष्परिणाम आहे. लोकशाहीमध्ये, नगर शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे किती आवश्यक आहे, याचे हे जिवंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.



मनपा कडून व्यवसाय परवाना शुल्कात तब्बल १६० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाची धक्कादायक बाब उजेडात आल्यानंतर ठाकरे शिवसेनेने या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. शहरात सुमारे ५० हजार लहान-मोठी दुकाने व व्यावसायिक आस्थापना असून या प्रस्तावामुळे व्यापाऱ्यांवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. काळे म्हणाले, ही तर केवळ सुरुवात आहे. पुढील पाच वर्षांत प्रत्येक घटकाला सत्ताधारी हे हुकुमशाही निर्णय लादून उध्वस्त करतील. राम मंदिरावर पडलेल्या दरोड्यावर मूग गिळून गप्प बसलेले तथाकथित ढोंगी हिंदुत्ववादी सगळ्यांना त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी एकीकडे जय श्रीरामचा नारा द्यायला लावत आहेत, तर दुसरीकडे स्वकष्टाने व्यापार, स्वयंरोजगारातून पोट भरणाऱ्यांना आर्थिक संकटाच्या खाईत लोटत आहेत.

काळे पुढे म्हणाले, मतदारांनी सभागृहात चुकीच्या निर्णयांना विरोध करण्यासाठी विरोधी पक्षालाही पुरेसे प्रतिनिधित्व दिले असते, तर आज सत्ताधाऱ्यांना असे मनमानी निर्णय घेण्याचे धाडस झाले नसते. जेव्हा सत्ताधाऱ्यांना एकतर्फी प्रचंड बहुमत मिळते तेव्हा सत्तेचा माज वाढतो आणि समाजातील विविध घटकांचे आर्थिक शोषण सुरू होते. आज अहिल्यानगरमध्ये नेमके तेच चित्र दुर्दैवाने सर्वच घटकातील नागरिकांना पहावे लागत आहे.

गल्ली ते दिल्ली सत्ता असून देखील महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात सत्ताधारी पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. स्वतःच्या चुकीच्या आर्थिक नियोजनाची, निष्क्रिय कारभाराची आणि अपव्ययाची किंमत आता शहरातील सुमारे ५० हजार व्यापाऱ्यांकडून वसूल करण्याचा हा अघोरी प्रताप सत्ताधाऱ्यांकडून केला जात असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे.

**२०२३ मध्ये आम्ही हा डाव हाणून पाडला**

सन २०२३ मध्ये देखील हा प्रस्ताव महासभेकडून मंजूर करण्यात आला होता. त्यावेळी आम्ही महापालिकेसमोर दोन दिवसांच धरण आंदोलन केलं.

## केडगावात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भानुदास कोतकर परिवाराच्या पुढाकारातून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या भैरवनाथ पायी दिंडीतील वारकऱ्यांचे केडगाव येथील मुस्लिम बांधवांनी गुलाबपुष्प व फळे देऊन स्वागत केले. धार्मिक सलोखा, सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. केडगाव येथून पंढरपूरकडे निघालेल्या भैरवनाथ दिंडीचे बुधवारी उत्साहात प्रस्थान झाले. विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या वारकऱ्यांच्या या दिंडीचे मुस्लिम समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी वारकऱ्यांना गुलाबपुष्प देऊन फळांचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र संतांची भूमी आहे येथे सर्वधर्मीयांच्या श्रद्धा, संस्कृती व परंपरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेची परंपरा जपण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. केडगाव येथे झालेल्या या



स्वागत सोहळ्यातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी हाजी उस्मान मणियार ,हुसेनभाई मंडपवाले, अब्दुलभाई बेकरीवाले, मुन्नाभाई सय्यद, दिलावरभाई मंडपवाले, बशीरभाई शेख,, मोहम्मद पठाण, सिराज शेख, शकील शेख, अब्दुलभाई अंडेवाले, अतिश पठाण, असलम मणियार आदींसह केडगाव परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १ ऑगस्टपासून एनसीएमसी कार्ड सक्तीबाबत संभ्रम : सिरसुल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सार्वजनिक वाहतूक अधिक डिजिटल, पारदर्शक आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) लागू करण्याचा निर्णय घेतला असून, १ ऑगस्ट २०२६ पासून सवलतीच्या प्रवासासाठी हे कार्ड अनिवार्य करण्याची तयारी सुरू आहे. मात्र राज्यभरात आतापर्यंत केवळ १० ते १५ टक्के सवलतधारकांनाच कार्डांचे वितरण झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे एनसीएमसी



कार्ड सक्तीची मुदत मार्च २०२७ पर्यंत वाढवावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे. पत्रकात म्हटले आहे की, राज्य परिवहन महामंडळाने ६५ ते ७५ वर्षांतील ज्येष्ठ नागरिक, ७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिक, १२ वर्षांवरील सर्व महिला, दिव्यांग, विद्यार्थी, पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक आदी सवलतधारकांसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात अशा लाभार्थ्यांची संख्या सहा कोटींपेक्षा अधिक असून, आतापर्यंत केवळ ४० ते ५० लाख कार्डांचे वितरण झाल्याची माहिती आहे. उर्वरित लाभार्थ्यांना ३१ जुलैपर्यंत कार्ड उपलब्ध करून देणे व्यवहार्य नसल्याने लाखो प्रवाशांमध्ये संभ्रम आणि गोंधळ निर्माण झाला आहे. सध्या राज्यातील लाखो वारकरी आषाढी वारीत सहभागी झाले असून, ग्रामीण भागातील अनेक नागरिक नोंदणी प्रक्रियेपासून दूर आहेत. अशा परिस्थितीत कार्ड सक्ती करणे अन्यायकारक ठरेल.

## चिमुकल्यांचा प्लॉस्टिक मुक्तीचा नारा

### कापडी पिशवी घेऊन बाजारात घेतला खरेदीचा अनुभव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बालवयातच व्यवहारज्ञान, पर्यावरण संवर्धन व सामाजिक मूल्यांची जाणीव रुजावी, या उद्देशाने द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलतर्फे विद्यार्थ्यांसाठी स्थानिक भाजी व फळ बाजाराचा शैक्षणिक अभ्यास दौऱ्याचे आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात चिमुकल्या 'ग्रीनव्हॅलियन्स'नी कापडी पिशव्या घेऊन बाजारात जाऊन खरेदीचा अनुभव घेतला . यावेळी विद्यार्थ्यांनी प्लास्टिक पिशवीला नकार देत प्लास्टिक मुक्तीचा नारा देऊन जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या भाज्या व फळांची खरेदी केली. प्रत्येक विद्यार्थ्याने घरून कापडी पिशवी आणत प्लास्टिकमुक्तीचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर ठेवला. भाज्या या महिन्याच्या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध भाज्या व फळांची ओळख झाली. खरेदी-विक्रीचा बाजारातील अनुभव, संवाद कौशल्य, आत्मविश्वास व सामाजिक पर्यावरण पूरक याचे ज्ञान मिळाले.

बालवयात व्यवहाराचे ज्ञान देतानाच पर्यावरणपूरक सवयी रुजविणारा हा उपक्रम समाजासाठी आदर्श ठरावा, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अनुभवाधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक आनंददायी व परिणामकारक होत असल्याचेही यावेळी दिसून आले.

उपक्रमाचे नियोजन व




द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलच्या चिमुकल्यांनी भाजी व फळ बाजारात प्लॅस्टिक मुक्तीचा नारा देत कापडी पिशवी घेऊन बाजारात घेतला खरेदीचा अनुभव. (छाया : समीर मन्यार)

मार्गदर्शन मुख्याध्यापिका. उमंग नंदा यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी . वैशाली सोनटक्के, समीना शेख, कु. नेहा व सुनिता मावशी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत करून त्यांना खरेदीचा आनंददायी अनुभव देणारे भाजी विक्रेते . अभिषेक तिवारी व त्यांच्या वडिलांचे द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलतर्फे विशेष आभार मानण्यात आले.

# वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी व्हा: उपमुख्यमंत्री पवार

## राज्य शासनाचे सन २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** राज्य शासनाने सन २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरविले असून यावर्षी सुरुवातीच्या टप्प्यात १८ कोटी वृक्ष लागवड करण्याचे नियोजन आहे; वृक्ष लागवड ही जन चळवळ करण्याकरिता शाळा,महाविद्यालये स्वयंसेवी संस्था,औद्योगिक कंपन्या आदींनी या मोहिमेत राज्य शासनासोबत सहभागी होऊन योगदान द्यावे, असे आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.कन्हेरी येथील पर्यटन उद्यानाचे 'स्व.मा.अजितदादा पवार पर्यटन उद्यान बारामती' आणि देवगिरी ते देवराई नाम फलकाचे अनावरण करुन राज्यव्यापी वृक्षसंवर्धन अभियानाच्या शुभारंभप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी वनसंरक्षक आशिष ठाकरेउपवनसंरक्षक अभिजित वायकोस,सहाय्यक वनसंरक्षक अतुल जैनक, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, वन परिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे, नगराध्यक्ष सचिन सातव, अभिनेता तथा सह्याद्री देवराई फाऊंडेशनचे सयाजी शिंदे यांच्या लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.



'स्व.मा.अजितदादा पवार पर्यटन उद्यान बारामती' आणि देवगिरी ते देवराई नाम फलकाचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

श्रीमती पवार म्हणाल्या, पर्यावरण रक्षण ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. शासन, उद्योग, सामाजिक संस्था आणि जनसहभाग यांच्या योग्य समन्वयातूनच आणि एकत्रित प्रयत्नांतूनच हरित, समृद्ध आणि शाश्वत महाराष्ट्राचं स्वप्न साकार होईल. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेली पर्यावरण संवर्धनाची ही प्रेरणा एका व्यापक चळवळीत रूपांतरित करूया आणि आपल्या महाराष्ट्राला सुजलाम् सुफलाम् बनवूया, असे आवाहन त्यांनी केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने उभारले जाणारे हे पर्यटन उद्यान निसर्गाशी जोडणारा, पर्यावरण शिक्षण देणारा आणि भावी पिढीला प्रेरणा देणारा केंद्रबिंदू बनेल, असा विश्वास व्यक्त करुन त्या पुढे म्हणाल्या, त्यांनी संपूर्ण राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. बारामतीवर तर त्यांचे विशेष प्रेम होते. हे उद्यान म्हणजे केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर बारामतीच्या प्रगती आणि दूरदृष्टीचं एक प्रतिक आहे. तसेच पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी आणि भावी पिढीला निरोगी आयुष्य देण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहेत. कन्हेरी येथील पर्यटन उद्यानाची संकल्पना, नियोजन व उभारणीमध्ये मोलाचं योगदान होते. कन्हेरी इथील राखीव वनातील ५५ हेक्टर क्षेत्रावर आतापर्यंत ८ कोटी ७५ लाख इतका निधी प्राप्त झाला आहे. त्या माध्यमातून दोन टप्प्यात काम होत आहे. त्यामध्ये पाथये सस्पेन्सन ब्रिज, सोलार पार्क, रॉक आणि बटरफ्लाय गार्डन विकसीत करण्यात आले आहे.या ठिकाणी देशी झाडांचे महत्व लक्षात घेऊन त्यांची जास्तीत-जास्त लागवड केली पाहिजे.

देवगिरी ते देवराई राज्यव्यापी वृक्षसंवर्धन अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सहकार्य केल्याबद्दल वनमंत्री गणेश नाईक यांचे आभार मानले, त्या पुढे म्हणाल्या पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि वनवृद्धीबाबत त्यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद, बहुमूल्य सहकार्यामुळे या अभियानाला निश्चितच एक नवी गती आणि ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त आहे.सयाजी शिंदे यांनी पर्यावरण संवर्धनाला केवळ एक शासकीय कार्यक्रम किंवा औपचारिकता न ठेवता त्याला एका मोठ्या लोकचळवळीचं स्वरूप दिलं आहे.'देवगिरी ते देवराई' या अभियानासाठी त्यांची आंतरिक प्रेरणा आणि त्यांचे सातत्यपूर्ण योगदान महत्वाचे आहे. हे अभियान केवळ एका विभागाचे किंवा शासनाचे नाही, तर हा आपल्या सर्वांचा एक सामूहिक संकल्प आहे. या स्तुत्य उपक्रमासाठी आणि अभियानासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, मुबंई पोर्ट ऑथॉरिटी, सह्याद्री देवराई फाऊंडेशन, एन्व्हायरमेंटल एन्व्हायरमेंटल फोरम ऑफ इंडिया संयुक्त वन व्यवस्थापन समित्या, इको डेव्हलपमेंट कमिट्या, विविध सीएसआर भागीदार, औद्योगिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवक जोडले गेले आहे. सर्वांनी एकत्र येऊन दाखवलेलं हे स्वारस्य आणि केलेले प्रयत्न खरोखर कौतुकास्पद आहेत.

# द•ख•ल

## डिंभे,बोरघर-आडिवरे परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट महिला वर्गात संताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव :** घोडेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील विविध भागांमध्ये अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. परिसरातील काही अंडा भुर्जी गाड्या, खानावळी तसेच इतर ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी मद्यपान आणि कथित अवैध मद्यविक्री होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शिनोली बीट परिसरातील काही ठिकाणी उघडपणे अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार करण्यात आल्या आहेत. मात्र, संबंधित यंत्रणेकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे. तसेच गोहे, डिंभे, बोरघर आणि अडिवरे परिसरातही कथित अवैध मद्यविक्री सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.स्थानिकांच्या माहितीनुसार, बोरघर बीट परिसरात नऊ ते दहा ठिकाणी अवैध धंदे सुरू असल्याचा दावा करण्यात येत असून, याबाबत विशेषतः महिला वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिक आणि महिलांच्या म्हणण्यानुसार, या संदर्भात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना अनेक वेळा लेखी तक्रारी व निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व तक्रारी आणि आरोपांच्या पार्श्वभूमीवर संबंधित पोलीस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणांकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष देत आहेत का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित पोलीस विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. पोलीस प्रशासनाची प्रतिक्रिया प्राप्त झाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे

## दुसऱ्याचा जीव वाचवताना रुग्णवाहिका चालकाचा मृत्यू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**आळेफाटा :** दुसऱ्या अपघातातील जखमीला उपचारासाठी घेऊन जात असताना रुग्णवाहिका क्रमांक एम. एच. १४ एल. बी. ४३ २९ व पीकप क्रमांक एम. एच. २४ बी डब्लू २०९२ या यांच्या भीषण झालेल्या अपघातात रुग्णवाहिका चालकाचा पुढील उपचारासाठी आळेफाटा येथे नेत असताना मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना अहिल्या नगर - कल्याण महामार्गावरील गायमुखवाडी, ता. जुन्नर येथे दि. १७ जुलै रोजी रात्री १२:३० च्या दरम्यान घडली मिळालेल्या माहितीनुसार,दि. १७ जुलै रोजी रात्री १२ च्या दरम्यान खामुंडी गावाजवळ टेंपो आणि ट्रक यांच्यात झालेल्या धडकेत काही जण जखमी झाले होते. त्यातील एका अपघातग्रस्ताला उपचारासाठी आळेफाटा येथील रुग्णालयात नेण्यासाठी रुग्णवाहिका रवाना झाली होती. गायमुखवाडी गावाजवळ पोहोचताच समोरून येणारे पीकप वाहन व रुग्णवाहिका यांच्या जोरदार धडकेत रुग्णवाहिकेचा मोठ्या प्रमाणात चक्काचूर झाला. या अपघातात रुग्णवाहिका चालक कुणाल तुकाराम डुंबरे, रा. डुंबरवाडी (ता. जुन्नर )यांचा जागीच मृत्यू झाला.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार नामदेव बांबळे, धनंजय पालवे, रेश्मा फापाळे, संगीता मधे यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. कुणाल डुंबरे हे दुसऱ्याचा जीव वाचवण्यासाठी जात असताना स्वतःच अपघाताला बळी पडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.या अपघाताचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शन खाली पोलीस हवलदार नामदेव बांबळे हे करत आहेत.

## मुखईत राष्ट्रीय पक्षी अंध मोराला जीवदान



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** मुखई (ता. शिरुर) येथील एका शेतामध्ये दोन दिवसांपासून उपाशी बसलेल्या अंध मोराला जीवदान देण्यात निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या प्राणीमित्रांना यश आले आहे. मुखई (ता. शिरुर) येथील एका शेतामध्ये दोन दिवसांपासून एक मोर असल्याचे प्रदीप दरेकर यांना दिसले, त्यांनी याबाबतची माहिती निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या प्राणीमित्रांना दिली, त्यांनतर वनविभाग वन्यजीव बचाव पथकाचे सदस्य व निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, वैभव निकाळजे, श्रीकांत भाडळे, राहुल गायकवाड यांनी सदर ठिकाणी धाव घेत पाहणी केली असता शेतामध्ये भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर त्याचे दोन्ही डोळे बंद होऊन अंध स्वरूपात असल्याचे दिसून आले, दरम्यान प्राणीमित्रांनी याबाबतची माहिती शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे, वनपरिमंडळ अधिकारी रुपावली जगताप, नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने यांना देत अंध मोराला ताब्यात घेऊन बावधन येथील प्राणी अनाथालयचे शुभम साळवे व प्रचीती भूतकर यांच्या माध्यमातून मोराला उपचारासाठी दाखल करण्यात आले.



## माझ्या प्रगतीला नैतिक धैर्याचे अधिष्ठान : अनास्कर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाविद्यालयीन काळात मी अतिशय दंगेखोर विद्यार्थी होतो. पण माझ्या मनात कधीच कोणाही विषयी कपट नव्हते. मित्र म्हणून मदतीसाठी माझ्याकडे कोणी आल्यास मी तत्परतेने मदत करीत राहिलो. मित्रांनी दिलेल्या पाठबळामुळे माझ्यात धैर्याची वृत्ती निर्माण झाली. माझ्या प्रगतीला याच नैतिक धैर्याचे अधिष्ठान आहे, असे मत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले. केंद्रीय सहकार मंत्रालयाला पाच वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत सहकार क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल बीएमसीसी अर्थात बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स आणि बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेतर्फे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांचा आज विशेष सत्कार सोहळा करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना विद्याधर अनास्कर बोलत होते. बीएमसीसी मधील सायरस पूनावाला सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अरूण निम्हण, उपाध्यक्ष सुरेश केकाणे, सचिव सुहास पटवर्धन, बीएमसीसीचे उपप्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, उपाध्यक्ष संजय साबळे उपस्थित होते. यावेळी विद्याधर अनास्कर यांना शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी आणि विठ्ठलाची मूर्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना विद्याधर अनास्कर म्हणाले की, आज मी जी विविध पदे भूषवित आहे, दुसऱ्यांच्या म्हशी राखून, लिज्जत पापड येथे पापड लाटून, दिवाळीत फटाके विकून, सवाई गंधर्वच्यावेळी बटाटे वड्याचा स्टॉल लावून मी पुढे सरकत राहिलो. माझ्या कष्टांचे भांडवल न करता मी शिकत राहिलो. आई-वडिलांच्या संस्कारांना शिक्षणाची आणि कामातील सातत्याची जोड मिळाल्यामुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो. यावेळी बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अरूण निम्हण, बीएमसीसी उपप्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष सूर्यकांत पाठक, चरणसिंग साहनी, डॉ. मुकुंद तापकीर आदींनी विद्याधर अनास्कर यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव सुहास पटवर्धन यांनी केले.

## बीएआयएफ रस्त्यावरील धोकादायक खड्डे तातडीने बुजविले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** वाघोली येथील बीएआयएफ (इ-खऋ) रोडवरील वरमाउंट (तरीरींपीं) व सवाना (डरींपर) सोसायटीसमोरील रस्त्याच्या साईड पट्ट्यांवर पडलेल्या धोकादायक खड्ड्यांमुळे पादचारी, दुचाकीस्वार तसेच स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

या समस्येमुळे अपघाताचा धोका वाढला होता. याबाबतची माहिती मिळताच भारतीय जनता पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष जयप्रकाश सुभाष सातव पाटील यांनी तातडीने पुढाकार घेत संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून रस्ता दुरुस्तीचे काम पूर्ण करून घेतले.

या कामासाठी स्थानिक नगरसेविका रत्नमाला संदीप सातव आणि नगरसेवक सुरेंद्र बापूसाहेब पठारे यांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. त्यांच्या समन्वयातून धोकादायक खड्डे तातडीने बुजविण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून संभाव्य अपघाताचा धोका टळला आहे.दीर्घकाळ प्रलंबित असलेली ही समस्या अल्पावधीत मार्गी लागल्याने स्थानिक नागरिकांनी भारतीय जनता पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष जयप्रकाश सुभाष सातव पाटील, नगरसेविका रत्नमाला संदीप सातव आणि नगरसेवक सुरेंद्र बापूसाहेब पठारे यांचे आभार व्यक्त केले. यावेळी जयप्रकाश सुभाष सातव पाटील यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत विकासकामांना गती देण्याचा आपला संकल्प कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला. तसेच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने समन्वय ठेवून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



## क्वांटम टेक्नॉलॉजी मिशनला शासनाचे पूर्ण सहकार्य : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास, संशोधन आणि क्षमतावृद्धीला शासन प्राधान्य देत असून, महाराष्ट्र क्वांटम टेक्नॉलॉजी मिशन तसेच फॅकल्टी डेव्हलपमेंटसारख्या उपक्रमांना शासनाचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

आय-हब क्वांटम टेक्नॉलॉजी फाउंडेशन (ख-क्गइ टढऋ), आयआयएसईआर पुणे यांच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र क्वांटम टेक्नॉलॉजी मिशन - फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' अंतर्गत प्रमाणपत्र वितरण व सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, आयआयएसईआर पुणेचे संचालक प्रा. सुनील भागवत तसेच राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांतील प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते.मंत्री श्री. पाटील म्हणाले, क्वांटम तंत्रज्ञान हे भविष्यातील अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र असून संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग क्षेत्राला नवी दिशा देण्याची क्षमता त्यात आहे. राज्यात सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शिक्षकांचे कौशल्यवर्धन, संशोधनाला प्रोत्साहन आणि उद्योग व शैक्षणिक संस्थांमधील समन्वय अधिक बळकट करणे आवश्यक आहे. या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी शासन निधीची कमतरता भासू देणार नाही. आवश्यकतेनुसार केंद्र शासनाकडूनही सहकार्य मिळवून दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.प्रा. सुनील भागवत यांनी महाराष्ट्रात क्वांटम तंत्रज्ञानाचा प्रसार, संशोधनाला चालना आणि भविष्यातील तंत्रज्ञानासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. शासनाच्या सहकार्यामुळे महाराष्ट्र क्वांटम टेक्नॉलॉजी मिशनला अधिक बळ मिळेल आणि राज्य तंत्रज्ञान क्षेत्रात देशात अग्रस्थानी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्रांचे वितरण करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

## शिक्रापूर पोलिसांच्या सतर्कतेने हरवलेले बालक आईच्या कुशीत



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तळेगाव रोड परिसरात हरवलेला तीन वर्षाचा बालक अर्ध्या तासात आईचा शोध घेऊन आईच्या स्वाधीन करण्यात पोलिसांना यश आले आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तळेगाव रोड परिसरात सकाळच्या सुमारास एक लहान बालक रडत कावराबावरा होऊन रस्त्याचे कडेला फिरत असल्याचे काही नागरिकांना दिसले, नागरिकांनी सदर बालकाला ताब्यात घेऊन शिक्रापूर पोलिस स्टेशन मध्ये आणले, त्यांनतर पोलिसांनी त्या बालकाची चौकशी केली त्याला काही सांगता येत नव्हते, दरम्यान पोलीस हवालदार चंद्रकांत काळे, नवनाथ नाईकडे, नारायण वाळके यांनी बालकाचे फोटो सोशल मिडीयावर प्रसारित करत आजूबाजूला बालकाच्या पालकांचा शोध घेतला असता पोलिसांच्या प्रयत्नाला अर्ध्या तासात यश येत तीन वर्षीय गौरवला रीना राठोड या त्याच्या आईच्या ताब्यात देण्यात आले, यावेळी बालकाच्या आईने देखील पोलिसांचे आभार मानले.

# शिरुर तालुक्यातील युवक वारीत देतोय वृक्ष वाचवण्याचा संदेश

## तहसीलदारांना सुबुद्धी देण्यासाठी तहसीलदारांचा फोटो वारीत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिरुर तालुक्यातील एक युवक वृक्ष लागवड व वृक्षांचे संगोपन करण्यासाठी अहोरात्र झटत असून संतराज महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होऊन वारीच्या माध्यमातून पाठीवर झाडाची कुंडी, तोंडावर ऑक्सिजन मास्क लावून वारीमध्ये वृक्षारोपणाचा संदेश देत असून यामध्ये शिरुरच्या तहसीलदार यांना सुबुद्धी देण्यासाठी तहसीलदारांचा फोटो वारीत घेऊन फिरुन शेवटी पांडुरंग चरणी ठेवणार आहे.

रांजणगाव सांडस (ता. शिरुर) येथील उमेश रणदिवे हा युवक अनेक वर्षांपासून वृक्षप्रेमाने झपाटला असून त्याने परिसरात हजारो वृक्ष लागवड करुन त्यांचे संगोपन देखील केले आहे, मात्र काही ठिकाणी लावलेल्या झाडांजवळील माती, मुरूम लोकांनी चोरून नेल्याने वृक्षमित्र उमेश रणदिवे याने शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्याकडे अनेकदा तक्रारी केल्या मात्र त्यांच्या तक्रारींची दखल घेतली नसल्याचा आरोप रणदिवे यांनी केला असून त्यांनी त्यांचे वृक्ष प्रेम कमी केले नाही, सध्या सुरु असलेल्या पंढरपूर वारीमध्ये श्री संतराज महाराज पालखी सोहळ्यात उमेश रणदिवे हा पाठीवर वडाच्या झाडाची

**शिरुर तालुक्यातील गायरानमध्ये लावलेली अनेक झाडे मुरूम व माती काढून नागरिकांनी तोडल्याने त्याची तक्रार प्रत्येक जनता दरबार मध्ये केली, झाडे वाचवण्यासाठी तहसिलदारांच्या पाया पडलो, तहसिलदारांच्या निष्क्रीयतेमुळे अनेक झाडे जळाली असल्याने पांडुरंगाने शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना सुबुद्धी देऊन त्यांच्या हातून जंगल वाचवावे म्हणून तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांचा फोटो हातात घेऊन वारीत चालत असल्याचे वृक्षमित्र उमेश रणदिवे यांनी सांगितले आहे.**

कुंडी तर तोंडावर ऑक्सिजन मास्क आणि गळ्यात शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के याचा फोटो घेऊन सहभागी होऊन नागरिक व वारकऱ्यांना झाडांचे महत्व पटवून देऊन वृक्षारोपण करण्याचा संदेश देत आहे, तर तापमाणाचा वाढता पारा यामुळे कमी होणारे ऑक्सिजन झाडापासून मिळते म्हणून प्रत्येकाने झाड लावून जगवण्याचा संदेश यामाध्यमातून शिरुर तालुक्यातील वृक्षमित्र उमेश रणदिवे देत असल्याने वारीमध्ये या वृक्षमित्राची चांगलीच चर्चा रंगली आहे.



## द•ख•ल

### राशीन बसस्थानकामध्ये स्वच्छतेची मोहीम



**राशीन :** गेल्या अनेक वर्षापासून राशीन बस स्थानक बाकावरती व परिसरामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी व धुळीचे साम्राज्य निर्माण झाले होते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कॉन्ट्रॅक्ट बेसेस वर राशीन बस स्थानक सफाई कामगाराची नेमणूक करण्यात आली. तसेच राशीन बस स्थानक परिसरात स्वच्छतेमुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. सफाई कामगार बशीर काझी हे राशीन बस स्थानका मधे कामगार म्हणून १/७/२०२६ रोजी नियुक्ती झाली आहे. व राशीन बस स्थानक परिसरात बसण्यासाठी बाकावर स्वच्छता केली जात आहे. परिसर कंट्रोल रूम तसेच प्रवाशांन साठी टॉयलेट स्वच्छता दिसून येत आहे. तसेच दररोज हजारो प्रवाशांची ये-जा असणाऱ्या ठिकाणी कचरा साठ न देणे आण जंतूनाशकांची फवारणी करून साथीच्या आजारांना रोखणे, हे त्यांच महत्त्वाचे काम करतांना दिसत आहे. राशीन बस स्थानकाचे कर्मचारी बशीर काझी यांची राशिन बस स्थानकामध्ये येणाऱ्या नागरिक तसेच प्रवासी यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### श्रीगोंद्यात महाविकास आघाडीचे उपोषण धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी



**श्रीगोंदा :** नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, तसेच दिल्ली येथे गेल्या १९ दिवसांपासून उपोषणास बसलेले शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरण संशोधक सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करण्यासाठी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर शनिवारी (१८ जुलै) महाविकास आघाडी व सामाजिक कार्यकर्त्यांनी एकदिवसीय उपोषण केले. उपोषणात ॲड. राजेंद्र नागवडे, अरविंद कापसे, स्मितल वाबळे, उद्धव गायकवाड, अनिल घनवट, अनिल कोकाटे, विलास वाघमारे, शांताराम पोटे, श्रीकांत ठवाल, शिवप्रसाद उबाळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिकांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला समर्थन दिले.

### श्री.साईबाबा पायी दिंडी पालखीचे मिरजगावात उत्साहात स्वागत



**मिरजगाव :** श्री.क्षेत्र शिर्डी येथील श्री.साईबाबा पायी दिंडी पालखी सोहळ्याचे कर्जत तालुक्यातील मिरजगाव शहरात बुधवारी, दि.१५ जुलै रोजी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. श्री.साईबाबा पालखीचे सदगुरू उद्योग समुहाचे अध्यक्ष उद्धवशेठ नेवसे व कुटुंबिय तसेच प्रतिष्ठित व्यापारी अशोक काकडे, राजेंद्र काकडे यांनी स्वागत व आरती करून मनोभावे दर्शन घेतले. नेवसे यांच्या निवासस्थानी साईनाथांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. या पालखी सोहळ्याचे स्वागत करताना सदगुरू उद्योग समूहाचे अध्यक्ष उद्धवशेठ नेवसे, सुनिताताई नेवसे, पो.नि. विजय झंजाड, ॲड. स्विकार नेवसे, डॉ. पंढरीनाथ गोरे, शेखर नेवसे, संपत बावडकर, हभप मैश्राम महाराज, दत्तात्रय डांगे, विठ्ठलराव अडागळे, भाऊसाहेब थेटे, भास्कर गवारे, महेंद्र शेळके, विठ्ठल पवार, शंकरराव फटांगरे, डॉ.प्रतिभा हळगुडे, शुभम काकडे, कुणाल काकडे आदींसह नेवसे, काकडे कुटुंबिय तसेच मिरजगाव शहरातील व्यापारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### ॲड. ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक ड. प्रतापराव ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त आज शनिवार ( दि.१८) रोजी श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखाना



स्थळावर ५०० वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याबाबतची माहिती कार्यकारी संचालक किरण शेलार, जनरल मॅनेजर रमेश गर्जे व प्रशासकीय अधिकारी पोपट केदार यांनी दिली आहे.या बाबत ते म्हणाले की, स्व. ढाकणे यांनी मोठ्या परिश्रमाने डोंगराळ परिसरात बोधेगाव भागात परिसरातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम केलेले आहे.आज त्यांच्यानंतर ड. प्रतापराव ढाकणे यांनी त्यांच्याच रुपाने शेतकरी बांधवांना सातत्याने न्याय देण्याचा संकल्प केला असून ते आजही करत आहेत. त्यांचा आज ५७ वा वाढदिवस शेवगाव - पाथर्डी विधानसभा मतदार संघात साजरा करण्यात येत असून कारखाना स्थळावर त्यांचे वाढदिवसानिमित्त कारखाना संचालक मंडळ,कर्मचारी व परिसराच्या वतीने ५०० वृक्षांची लागवड होत असल्याचेही शेवटी शेलार, गर्जे व केदार यांनी सांगितले आहे.

### पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव, हातगाव परिसरात पावसाळ्याच्या चालू हंगामाचा जून महिना उलटला असून जुलैही संपत आला असल्याने मेघराजाने आकाशाकडे पहायला लावले असल्याने थोड्या - फार पडलेल्या पावसावर खरीपाचा हंगाम वाया जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी मागचा पुढचा विचार न करता पाऊस पडेलच अशी डेरिंग करून पेरण्या व लागवडी केलेल्या आहेत. पेरणीनंतर पिके उगऊनही आली आहेत.मात्र पावसाने पुन्हा हुलकावणी दिल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. अगोदरच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी उसनवार करून मोलमहागाईचे बी - बियाणे खरेदी करून पेरण्या केलेल्या आहेत.परंतु पेरणी केलेल्या पिकास पावसाची खूप गरज असून उगऊन आलेले पीक करपून जाऊ लागले.

# प्रसंगावधानाने वाचले ३८ जीव!

## बीड बायपासवर पेटत्या एसटीतून प्रवाशांची सुखरूप सुटका ; चार प्राध्यापकांच्या धाडसाला सलाम



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** बीड बायपास परिसरात मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. इचलकरंजी डेपोची संभाजीनगर-इचलकरंजी मार्गावरील एसटी बसच्या मागील भागाला अचानक आग लागली. मात्र, सोनिया गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयातील चार प्राध्यापकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे बसमधील सुमारे ३८ प्रवाशांचे प्राण वाचले.

मिळालेल्या माहितीनुसार सोनिया गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयातील प्राचार्य प्रा. अमोल नागवडे, प्रा. गणेश शितोळे, प्रा. दिलीप विघ्ने आणि प्रा. वैभव पवार हे चौघे दिल्लीहून संभाजीनगर येथे विमानाने आलेल्या प्रा. दिलीप विघ्ने यांना बीड येथे सोडण्यासाठी चारचाकी वाहनातून जात होते. याचवेळी त्यांच्या निदर्शनास पुढे जाणाऱ्या एसटी बसच्या मागील बाजूस धूर व आग लागल्याचे दिसले.त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांनी बसचालकाला गाडी थांबविण्याचे इशारे केले. सुरुवातीला बस न थांबल्याने त्यांनी सातत्याने पाठलाग करून अखेर बस थांबवली. त्यानंतर बसला आग लागल्याची माहिती चालक व प्रवाशांना देत सर्व प्रवाशांना तातडीने खाली उतरविण्यात मदत केली. अवघ्या काही मिनिटांत बसने भीषण पेट घेतल्याने घटनास्थळी एकच खळबळ उडाली. मात्र, वेळेत बस रिकामी करण्यात आल्यामुळे मोठी जीवितहानी टळली आणि सुमारे ३८ प्रवाशांचे प्राण वाचले.या धाडसी कृतीबद्दल बसमधील प्रवासी आणि बसचालक यांनी चारही प्राध्यापकांचे मनापासून आभार मानले. पंढरपूर वारीसाठी निघालेल्या वारकरी भाविकांनीही भावूक होत, आज तुमच्या रूपाने विठ्ठलच धावून आला, अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली.वेळीच दिलेला इशारा... आणि ३८ प्रवाशांना मिळाले जीवनदान!असे बोलले जात आहे या प्रसंगामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली असून, सोनिया गांधी पॉलिटेक्निकच्या चारही प्राध्यापकांच्या धाडस, सामाजिक बांधिलकी आणि प्रसंगावधानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## संत वामनभाऊ महाराज दिंडीचे स्वागत व फराळाचे वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** सद्गुरु सुदिक्षा माताजींच्या आशीर्वादाने तसेच अहिल्यानगर झोनल प्रमुख हरीश खूप चंदानी जी यांच्या प्रेरणेने

आज जामखेड जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी संत निरंकारी मिशन शाखा जामखेड च्या वतीने संत वामनभाऊ महाराज दिंडीचे स्वा गत एवं फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, नगरसेविका सिमा कुलकर्णी, प्रदीप टापरे, पांडुराजे भोसले, रणजीत सुराणा, बाळासाहेब गुळवे, संजय खरात, नगरसेवक वसीम सय्यद, वैभव राळेभात, गणेश पोकळे, अखिलेश राळेभात, राजाराम कांबळे, रवी जमदाडे, रेखा गंभीर, रश्मी गंभीर, वंदना राळेभात, तसेच संत निरंकारी मिशनचे सेवादल आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अमित गंभीर सेवा दल इन्चार्ज भरत देडे जी यांनी दिंडीचे स्वागत केले आणि सर्वांचे आभार मानले.

## खोटा दावा करून स्थगिती : याचिका निकाली

### उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय ; १० जणांना ५० हजारांचा दंड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड शहरातील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईस स्थगिती मिळविण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने याचिकाकर्त्यांनी न्यायालयासमोर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्याने रिट याचिका निकाली काढत संबंधित १० याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ५० हजारांचा खर्च लावला आहे.

जामखेड नगरपरिषदेतर्फे अतिक्रमण हटविण्यासाठी बजावण्यात आलेल्या नोटिशींविरोधात १८ जणांनी ही रिट याचिका दाखल केली होती. यापूर्वी ४ मार्च २०२६ रोजी न्यायालयाने याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून अंतरिम स्थगिती दिली होती.

सुनावणीदरम्यान जामखेड नगरपरिषदेच्या वतीने ड. सुहास राजेंद्र शिरसाट यांनी प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, याचिकेत सर्व १८ जण यापूर्वीच्या न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात त्यापैकी केवळ ८ जणच पूर्वीच्या याचिकांमध्ये सहभागी होते, तर उर्वरित १० जण प्रथमच न्यायालयात आले होते. त्यामुळे याचिकेतील हा दावा वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगरपरिषदेचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने संबंधित याचिकाकर्त्यांनी चुकीची माहिती देऊन अंतरिम स्थगिती मिळवल्याचे नमूद केले. त्यानुसार आशाबाई संतोष बाफना, अशोक जगन्नाथ बोरा, सदाशिव महादेव उतेकर, लेखीचंद चंदमल बाफना, नारंगीबाई सुरजमल सुराणा, रमेश हरकचंद गुगळे, किसन रामभाऊ पेचे, सुनील बाबासाहेब उगले, अशोक चंपालाल बाफना आणि मंजूरअली अमीर सय्यद या १० याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ५० हजारांचा खर्च (ऊँीं) लावण्यात आला असून ही रक्कम चार आठवड्यांच्या आत ॲडव्होकेट्स असोसिएशन, उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. सदर प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर पार पडली.

## श्रीराम तीर्थ प्रासादिक पायी दिंडी पंढरपूरकडे

**चिचोंडी पाटील :** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथून श्रीराम तीर्थ प्रासादिक पायी दिंडी सोहळ्याचे गुरुवारी अत्यंत भक्तिमय आणि भावनिक वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान झाले. गावातील हजारो भाविक, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या उपस्थितीत टाळ-मृदुंगाच्या निनादात, विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषात आणि हरिनामाच्या अखंड गजरात दिंडी मार्गस्थ झाली. दिंडीला निरोप देण्यासाठी संपूर्ण गाव एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. श्री संत सद्गुरू गणेशनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने, ह.भ.प. स्वामी शामसुंदर पुरी महाराज यांच्या प्रेरणेने, ह.भ.प. स्वामी रामानंद पुरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ह.भ.प. संजय महाराज घोडके यांच्या समवेत निघालेल्या या दिंडीचे यंदाचे पाचवे वर्ष आहे.

## जिल्हा बँक निवडणुक : ठरावांची 'राजकीय परीक्षा' १७६ पैकी १७१ ठराव, ५ संस्था ठरावाविना!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा तालुक्यात ठराव संकलनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, १७६ पात्र संस्थांपैकी तब्बल १७१ संस्थांचे ठराव प्राप्त झाले आहेत. मात्र उर्वरित पाच संस्थांमध्ये ठराव होऊ न शकल्याने स्थानिक राजकारण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

ववववमिळालेल्या माहितीनुसार तालुक्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्था जगताप आणि नागवडे यांच्याच ताब्यात आहेत तर काही अंशी पाचपुते यांच्या ताब्यात आहेत त्यातील खरातवाडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, मिरावली विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, अरणगाव आणि चिखलठणवाडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी येथे स्थानिक राजकीय कुरघोडी, गटबाजी आणि ठरावासाठी झालेल्या रस्सीखेचीमुळे ठराव होऊ शकले नाहीत. तर नागनाथ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी आणि जय भवानी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, हिरडगाव या संस्था अवसानात असल्याने त्यांचेही ठराव झाले नसल्याची माहिती समोर आली आहे.मतदारसंघनिहाय पाहता, शेतीपूरक मतदान संघातील १४२ पात्र संस्थांपैकी केवळ ५४ ठराव प्राप्त झाले, तर बिगरशेती मतदारसंघातील १३८ संस्थांपैकी १०४ ठराव प्राप्त झाले आहेत. दरम्यान, काही संस्थांमध्ये ठरावच होऊ न शकल्याने तालुक्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. संबंधित भागातील नेत्यांचे संघटन कौशल्य कमी पडले का, की अंतर्गत मतभेदांमुळे ही परिस्थिती निर्माण झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे काही ठिकाणी ठराव झालेच नाहीत, हे नेत्यांचे यश की अपयश? हा सध्या तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे.

## नागपंचमी यात्रेत पाळण्यांचे दर निश्चित करा : बोथरा

**जामखेड :** येत्या १७ ऑगस्ट २०२६ रोजी जामखेड येथे भरणारी पारंपरिक नागपंचमी यात्रा शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर, यात्रेत येणाऱ्या पाळण्यांचे तिकीट दर सर्वसामान्यांना परवडणारे असावेत आणि लिलाव पद्धतीमुळे होणारी लूट थांबवावी, या मागणीसाठी 'अनुलोम मित्र' सदस्य तथा जामखेड शहर उचज तुषार बोथरा यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन दिले. या निवेदनात जामखेड शहरातील नागपंचमी यात्रेचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले आहे की, या ऐतिहासिक यात्रेसाठी तालुक्यासह राज्यातील विविध भागांतून लाखो भाविक व नागरिक उपस्थित राहतात. यात्रेत बच्चेकंपनी आणि कुटुंबांसाठी पाळणे हे मुख्य आकर्षण असते. मात्र, गेल्या काही वर्षांत पाळण्यांच्या तिकीट दरांमध्ये भरमसाठ वाढ होत असल्याने गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना आर्थिक फटका बसत आहे. अनेकदा हे तिकीट दर १०० रुपये किंवा त्यापेक्षाही अधिक आकारले जातात, ज्यामुळे अनेक गरीब कुटुंबे या आनंदापासून वंचित राहतात.

## शाळकरी विद्यार्थ्यांना मिळणार 'दादां'च्या कर्तृत्वाची प्रेरणा!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती प्रदेशाध्यक्षा तथा अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीच्या सदस्या संध्याताई सोनवणे यांच्या वतीने जामखेड तालुक्यात एक अत्यंत स्तुत्य आणि सामाजिक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आगामी जयंतीचे औचित्य साधून जामखेड तालुक्यातील तब्बल २१३ प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालयांमध्ये मा. अजितदादा पवार यांची आकर्षक फोटो फ्रेम सप्रेम भेट म्हणून देण्यात येणार आहे. या अनोख्या उपक्रमामुळे तालुक्यातील शैक्षणिक वर्तुळातून व नागरिकांमधून संध्याताई सोनवणे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. मा. उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार हे त्यांच्या कणखर प्रशासकीय कौशल्यासाठी, वक्तशीरपणासाठी आणि लोकहिताच्या धडाडीच्या निर्णयांसाठी ओळखले जातात. भावी पिढीला, म्हणजेच शालेय विद्यार्थ्यांना दादांच्या या गुणांची व कर्तृत्वाची सातत्याने प्रेरणा मिळावी, या उदात्त हेतूने संध्याताई सोनवणे यांनी हा उपक्रम आयोजित केला आहे. तालुक्यातील शाळांच्या मुख्य कार्यालयात किंवा प्रार्थना सभागृहात ही फोटो फ्रेम लावली जाणार असून, त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा आणि ध्येयवादी विचार रुजण्यास मदत होणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी जामखेड तालुक्यातील शाळांकडून मोठ्या प्रमाणावर उत्सुकता दाखवली जात आहे. इच्छुक शाळांना एक माहिती अर्ज भरून द्यावा लागणार असून, यामध्ये शाळेचे नाव, युडायस कोड, मुख्याध्यापकांचे नाव व संपर्क क्रमांक या माहितीसह अधिकृत अर्ज सादर करावा लागणार आहे. यानंतर संबंधित शाळांना सन्मानपूर्वक ही फोटो फ्रेम सुपूर्द करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे या केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक क्षेत्रातही नेहमीच अग्रेसर असतात. जामखेड तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणाचे उपक्रम राबवून त्यांनी नेहमीच आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. आता थेट तालुक्यातील २१३ शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्यांनी आपल्या सामाजिक कार्याचा आलेख अधिक उंचावला आहे.

## कोरडगावात मतदान यादीच्या सखोल पुर्ननिरिक्षणाला वेग

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्या अद्ययावत व अचूक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण अभियानाला कोरडगाव परिसरात वेग आला आहे. कोरडगाव व औरंगपूरा येथील बीएलओ ग्रामपंचायत कार्यालयात बसून मतदार नोंदणी, दुरुस्ती व पडताळणीचे काम करीत आहेत, तर मुखेकरवाडी येथील कामकाज स्थानिक शाळेतून सुरू आहे. कोरडगावचे बीएलओ नवनाथ भताने हे ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांचे



अर्ज स्वीकारून नवमतदारांची नोंदणी, नावातील व पत्त्यातील दुरुस्ती तसेच आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करीत आहेत. त्यांना बी एल ओ सहाय्यक सुनिल शिंदे हे मदत करत आहे.

# सरला बेट पायी दिंडीचा मिरजगावात रिंगण सोहळा





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील भारत विद्यालयाच्या प्रांगणात महंत सद्गुरू गंगागिरी महाराजांच्या पायी दिंडीचा रिंगण सोहळा गुरूवारी, दि.१६ जुलै रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला.

श्री.क्षेत्र गोदावरी धाम सरला बेट येथून पंढरपूर येथे आषाढी एकादशीसाठी जाणाऱ्या सद्गुरू गंगागिरी महाराजांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे मिरजगाव शहरात आगमन होताच उद्योजक रावसाहेब खिळे, आजिनाथ खिळे, कानडी बुद्रुकचे युवा सरपंच गणेश खिळे, युवा उद्योजक किरण खिळे व खिळे कुटूंबियांनी पायी दिंडी पालखीचे वाजत गाजत फटाक्यांची आतिषबाजी करत उत्साहात स्वागत केले. नंतर खिळे कुटुंबियांनी पालखीची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. हभप रामगिरी महाराज यांचा शाल, श्रीफळ देऊन खिळे कुटुंबियाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

येथील भारत विद्यालयात भव्य मैदानात गोल रिंगण करून उभे असलेल्या वारकऱ्यांच्या मध्यभागी गोल रिंगणात पांढरा शुभ्र अश्व दौडायला लागला आणि पावसाचे सरी बरसल्या. रिंगण सोहळ्यात उंच उंच पताका, टाळ - मृदंगाचा गजर, भक्तीमय अभंग अन् विठुनामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

हा रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिपूर्ण वातावरणात पार पडला. एकीकडे ज्ञानोबा... तुकाराम...हरि मुखे म्हणा...हरि मुखे म्हणा...पुण्याची गणना कोण करी.... अशा जयघोषाचा गजर तर दुसरीकडे वारकऱ्यांनी गोल केलेल्या रिंगणात चौकट न मोडता धावत जाणाऱ्या अश्वांच्या टापांचा निनाद पाहून या सोहळ्याने मिरजगावकरांच्या व भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांसह परिसरातून आलेल्या भाविकांनी हा भव्यदिव्य आणि ऐतिहासिक रिंगण सोहळा ' याचि देही ' याचि डोळा ' अननुभवला. मिरजगावात रिंगण सोहळा होत असल्याने टाळ मृदुंगाच्या भक्तीमय वातावरणात परिसरातील भाविक भक्तांनी रिंगण सोहळा पाहण्याकरिता मोठी गर्दी केली होती. या दिंडीमधील शेकडो वारकऱ्यांना मे.गणेश उद्योग समुहाच्या वतीने खिळे बंधू यांनी जेवणाची व मुक्कामाची व्यवस्था केली होती. श्री.क्षेत्र गोदावरी धाम सरला बेट ते श्री.क्षेत्र पंढरपूर या पायी दिंडी पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांची मिरजगावात खिळे कुटुंबिय गेली अनेक वर्षांपासून अखंडीतपणे सेवा करत असून ही परंपरा अनेक वर्षांपासून अविरतपणे जपली जात आहे. श्री.क्षेत्र पंढरपूरकडे शिस्तबद्ध पद्धतीने पायी निघालेल्या गुरूवर्य गंगागिरी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या श्री.क्षेत्र गोदावरी धाम सरला बेट या पायी दिंडीला तब्बल २०० हून अधिक वर्षांची परंपरा असुन गुरुवर्य नारायणगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने महंत रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.क्षेत्र सरला बेट ते श्री.क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी पालखी सोहळा पार पडत आहे.

यावेळी सोहळ्यात गणेश उद्योग समूहाचे सर्वेसर्वा उद्योजक रावसाहेब खिळे, आजिनाथ खिळे, योगेश खिळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय झंजाड, ॲड.भापकर, ॲड. सलमान पठाण, संपत बावडकर, बापू तापकीर, राम सुपेकर, अभंग बोरुडे, मुन्ना भंडारी, शेंडगे गुरूजी, खिळे परिवार आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वारकरी संप्रदायात जात-धर्माला स्थान नाही !

वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्रावर मोठे उपकार आहे. महाराष्ट्राला हजारो वर्षांची वारकऱ्यांची परंपरा असून वारकरी संप्रदायाने कधीही जात धर्माचा विचार केलेला नाही. सर्वांना बरोबर घेऊन चालत आलेला आहे. समाजामध्ये विकृत पद्धतीचे काही लोक असल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं पाहिजे. सत्कर्मानीच कर्म शुद्ध होऊन दुःख दूर होऊ शकते. निष्काम भावनेने कर्म करत राहिल्यास देवाला त्याचे फळ द्यावेच लागते. वारीमुळे जीवनातील दुःखाचे निवारण होते. असे मत महंत रामगिरी महाराज यांनी व्यक्त केले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.१८ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## श्रीरामपूरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही : उपमुख्यमंत्री शिंदे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : शिवसेनेचे युवानेते सचिन बडदे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नंदनवन येथे भेट घेऊन श्रीरामपूर शहर व तालुक्यातील विविध प्रलंबित विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी शहरातील विकासाच्या रखडलेल्या प्रश्नांसह सध्याच्या सामाजिक व राजकीय वातावरणाची वस्तुस्थितीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांसमोर मांडली. सचिन बडदे यांनी श्रीरामपूरच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध योजनांना गती देण्याची मागणी केली. तसेच शहरातील नागरिकांच्या भावना आणि स्थानिक पातळीवरील परिस्थितीची माहितीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांना दिली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीरामपूर शहर व तालुक्याच्या विकासासाठी कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही दिली. तसेच शहरातील सध्याच्या परिस्थितीकडे स्वतः लक्ष घालून सत्य परिस्थितीच्या बाजूने ठामपणे उभे राहू, असे आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती सचिन बडदे यांनी दिली. या भेटीमुळे श्रीरामपूरच्या प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# हळद रुसली कुंकू हसले...दादा आले, भेटले, प्रश्न सुटला!

अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी** : येथील गावकऱ्यांनी अतिशय प्रतिष्ठेचा केलेला बारा चारीचा प्रश्न सोडवण्यात डॉ. सुजय विखे यांना यश आले . अगदी छोटा असलेला प्रश्न परंतु दोन गटांत रिसीला लागलेला संघर्ष व एकमेकांना बघून घेण्याच्या तयारी पर्यंत पोहचला असताना डॉ. सूजय विखे यांनी कोणताही गाजावाजा न करता नुसत्या आपल्या एकाच भेटीने दोन्ही नव्हे तर तिन्ही गटांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण केल्याने हळद रुसली कुंकू हसले अशीच काहीशी करामत डॉ. सुजय विखे यांनी केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून १२ चारी वरील नागरीक व नगरपालिका प्रशासन यांच्यात चारी बंदीस्त करून रस्ता करण्याच्या मुद्यावरुन संघर्ष पेटला होता . १२ चारी वरील नागरिकांनी या भागासाठी वरदान ठरलेली चारी भूमिगत करू नये यासाठी नगर पालीका प्रशासना विरोधात शडडू ठोकला होता.

या मागणीचे निवेदन देत पालिकेवर मोर्चा काढला होता. तसेच राहाता न्यायालयात हे काम होऊ नये म्हणून खटला दाखल केला होता. मुख्याधिकारी सतिश दिघे यांची भूमिका सदर काम पुर्ण करण्याकडे होता. त्यामुळे नागरिकांच्या भावना तिव्र होत मुख्याधिकारी सतिश दिघे चले जाव चा नारा देण्यात आला होता व कोणत्याही परिस्थितीत काम करू देणार नाही अशी भूमिका स्थानिकांनी घेतल्याने अखेर ते काम स्थगीत ठेवण्याचा निर्णय उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्या मध्यस्थीने घेण्यात आला होता. काही दिवस हे काम शांत असताना ठेकेदाराने चारीतील नळ्यावर मुरुम टाकण्याचा प्रयत्न झाला असता सोसायटी चे माजी अध्यक्ष आप्पासाहेब कोते, मा संचालक विनायक कोते, अक्षय कोते, प्रकाश कोते यांनी जोरदार आक्षेप घेत मुख्याधिकारी दिघे वर तोफ डागली होती. यावर उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी तिव्र नाराची व्यक्त करत दिघे यांचे वर खालच्या पातळीत बोलण्यावरून पत्रकार परिषद घेत त्या वक्तव्याचा निषेध करत असा प्रकार खपवून घेणार नाही अशी भूमिका घेतली होती.

आता या कामाचा सोक्ष मोक्ष डॉ सुजय विखे हेच करतील या आशेने शिर्डीकर लोणीकडे नजर ठेवून बसले होते आणि अखेर तो दिवस उजाडला डॉ सुजय विखे १३ जुलै सोमवारी शिर्डीत हजर झाले. मुख्याधिकारी दिघे, उपनगराध्यक्ष, नगराध्यक्ष सर्व नगरसेवक घेत प्रथम ते काम होण्याच्या बाजूने असलेले माजी नगरसेवक उत्तम भैया कोते यांच्या निवासस्थानी पोहचले तेथे जमलेल्या जन समुदायाने हे काम पूर्ण झाले पाहिजे अशी भूमिका घेतली त्यानंतर ते माळ वस्ती वरील सोसायटीचे माजी संचालक विनायकराव कोते यांच्या निवासस्थानी पोहचले तेथे महिला आणि पुरुष या स्थानिक नागरिकांचा मोठा जमाव चेहऱ्यावर गंभीर भावमुद्रा घेऊन उपस्थित होता. दादांनी बोला मी तुमच्या बाजूंनी बोलताच सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले की जे या बैठकीत मोठा संघर्ष होतो कि काय हे डोक्यात घेऊन बसले होते. विखे परिवार जनहिताचे बाजूने म्हणताच प्रश्न मिटला. दोन्ही गटाला वाटले आपणच जिकलो असा मध्यम मार्ग डॉ विखे यांनी काढल्याने हळद रुसली पण कुंकू हसले असेच प्रत्यय १२ चारीच्या मुद्द्यावरून अधोरेखित झाला आहे.

## सोनेवाडीत गळफास घेऊन एकाची आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी येथील नगदवाडी परिसरात वास्तव्यास असलेले यमाजी महादु बर्डे वय ५३ वर्ष यांनी शुक्रवारी रात्री पोहेगाव सावळीविर रोडवर तुमचा भागवत जावळे यांच्या शेताजवळ वनविभागाने लावलेल्या झाडाला दोरीच्या साह्याने फाशी घेऊन आपले जीवन संपवले. सकाळी सहा वाजता मृताचे भाऊ पोपट महादू बर्डे यांच्या ही घटना लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलीस पाटील दगू गुडघे यांना या संदर्भात माहिती दिली. पोलीस पाटील दगू गुडघे घटनेचे गांभीर्य लक्षात घेत कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनला कळवले. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल श्री कुकडे यांनी घटनास्थळीत घटनेचा पंचनामा करत पुढील कारवाई केली. रात्री झोपेतून उठून प्रात:र्विधीसाठी बाटली घेऊन पोहेगावच्या दिशेने यमाजी बर्डे गेले असल्याचे कुटुंबाने सांगितले. शवविच्छेदन केल्यानंतर दुपारी शोकाकुल वातावरणामध्ये सोनेवाडी अमरधाम येथे बर्डे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस स्टेशनला आकस्मिक मृत्यूची नोंद झाली असून पुढील तपास कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन करत आहे.

## भिक्षेकऱ्याच्या वेशात संशयिताची घरांची पाहणी?

### खळी परिसरातील नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील खळी येथे भिक्षेकऱ्याच्या वेशात आलेल्या एका अनोळखी व्यक्तीच्या संशयास्पद हालचालीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. १७) खळी येथील सुभाष लबडे व लक्ष्मण उगलमुगले यांच्या घरी एक अनोळखी व्यक्ती भिक्षा मागण्यासाठी आली होती. त्यावेळी घरात केवळ महिला होत्या. त्यांनी भिक्षा दिल्यानंतरही संबंधित व्यक्ती परिसरात थांबून घराची पाहणी करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

त्यानंतर त्याने महिलांकडे ५०० रुपयांची मागणी केल्याचे सांगण्यात आले. ही बाब समजल्यानंतर सुभाष लबडे यांनी संबंधित व्यक्तीला जाब विचारला असता त्याने शिवीगाळ व दमदाटी केल्याचा आरोप आहे. तसेच आम्ही रात्रीही येऊ आणि तुमचे सोने-पैसे कसे सांभाळता ते पाहू, अशा प्रकारच्या धमक्या दिल्याचेही सांगण्यात आले. सदर व्यक्ती एमएच-१७-सीटी-४३५७ क्रमांकाच्या मोटारसायकलवर आल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे.



या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अनोळखी व्यक्तींना घरात प्रवेश देताना सावधगिरी बाळगावी, घरात महिला, ज्येष्ठ नागरिक किंवा लहान मुले एकटी असल्यास विशेष दक्षता घ्यावी तसेच कोणतीही संशयास्पद व्यक्ती, वाहन किंवा हालचाल आढळल्यास तात्काळ स्थानिक पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आरोपींवर 'मकोका' लावा, खटला फास्ट ट्रॅक चालवा; पोलीस अधीक्षकांकडे मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील युवा हॉटेल व्यावसायिक आकाश शेखर दुबैय्या यांच्या निर्घृण या गंभीर प्रकरणाने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या प्रकरणातील आरोपींवर 'महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा' (मकोका) अंतर्गत कारवाई करावी, तसेच हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून, सरकारतर्फे खटला लढण्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून खा. ड. उज्वल निकम यांची नियुक्ती करावी, अशी आक्रमक मागणी श्रीरामपूर-राहुरी मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे केली आहे.



आकाश दुबैय्या यांच्या हत्येच्या निषेधार्थ श्रीरामपूर शहरातील व्यापाऱ्यांनी, विविध सामाजिक संस्थांनी आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी सलग चार दिवस शहर बंद पाळून तीव्र संताप व्यक्त केला होता. याच पार्श्वभूमीवर, आ. हेमंत ओगले यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेऊन त्यांना या प्रकरणी निवेदन दिले. प्राथमिक माहितीनुसार, या गुन्ह्यातील आरोपी हे संघटीत गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. त्यांच्या टोळीची शहरात मोठी दहशत आहे.

त्यामुळे सर्व संबंधित आरोपींवर 'मकोका' अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी. हे प्रकरण अत्यंत संवेदनशील व गंभीर असल्याने, खटला दीर्घकाळ प्रलंबित न राहता तो जलदगतीने निकाली काढण्यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा. खटल्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी, शासनाने विशेष सरकारी वकील म्हणून खा. ड. उज्वल निकम यांची नियुक्ती करावी.

यावेळी बोलताना आ. ओगले म्हणाले की, दुबैय्या कुटुंबाला न्याय मिळणे आणि समाजात कायद्याचा धाक निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. श्रीरामपूरमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून गृह विभागास तात्काळ आवश्यक ते निर्देश द्यावेत. या प्रकरणाच्या तपासाबाबत आणि आरोपींवर होणाऱ्या कारवाईबाबत प्रशासनाकडून काय पावले उचलली जातात, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

**शहरात आणि एमआयडीसी परिसरात उघडकीस आलेल्या ड्रग्ज प्रकरणाने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. नांदूर शिवारात सोहेल जुबेर शेख या संशयिताकडून लाखो रुपयांचे अमली पदार्थ जप्त केल्यानंतर, या गुन्ह्यातील 'जिहादी' कनेक्शनचा तपास करून यामागील सूत्रधारांचा पर्दाफाश करावा, अशी आक्रमक मागणी हिंदू रक्षाकृती समितीचे निमंत्रक प्रकाश चित्ते यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.**

## महाराष्ट्र सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष भिमजीभाई पटेल यांचे निधन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील ज्येष्ठ समाजसेवक, महाराष्ट्र सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष, पटेल हायस्कूलचे संस्थापक, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष तसेच श्रीरामपूर नगरपालिकेच्या पाणीपुरवठा समितीचे माजी सभापती आणि माजी नगरसेवक भिमजीभाई प्रेमजीभाई पटेल (वय ८१) यांचे शुक्रवारी (दि.१७) दुपारी २ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, पुतणे आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (दि.१८) सकाळी ९ वाजता बेलापूर रोडवरील पटेल बिल्डिंग, गायत्री सॉ-मिल शेजारील निवासस्थानापासून निघणार आहे. त्यांच्या निधनाने श्रीरामपूरच्या सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

## कार व ॲपे रिक्षाच्या भिषण अपघातात महिला ठार व तीनजण गंभीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील डिग्रस फाटा येथे नगर मनमाड राज्य महामार्गावर दि. १७ जुलै रोजी सायंकाळी चारचाकी कार व पे रिक्षाचा भीषण अपघात झाला. या घटनेत तीनजण गंभीर जखमी दोनजण किरकोळ जखमी झाले असून एक ५५ वर्षीय महिला जागीच ठार झाली. चांगुनाबाई पवार व त्यांचे पती दि. १७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४.४५ वाजे दरम्यान पे रिक्षामध्ये बसून राहुरीकडून डिग्रस येथे जात होते. रिक्षा नगर मनमाड महामार्गावर वरुन डिग्रस फाट्याकडे वळत असताना एक चारचाकी कार नंबर एम एच १४ बी ए ५०६४ ही गाडी नगरकडून राहुरीकडे येत होती. त्यावेळी चारचाकी कारने पे रिक्षाला जोरदार धडक दिली. यावेळी रिक्षा दोन ते तीन पलटी घेऊन रस्त्याच्या कडेला पडली. अपघाता नंतर परिसरातील नागरिकांनी ताबडतोब घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य केले. या भीषण अपघातात रिक्षामधील चांगुनाबाई भिमा पवार, वय ५५ वर्षे, रा. डिग्रस, ता. राहुरी, ह्या जागीच ठार झाल्या तर रिक्षा चालक सिताराम ऊर्फ ताया सिताराम शिंदे, रा. गोटूंबे आखाडा, भिमा बाबूराव पवार, रा. डिग्रस तसेच चारचाकी कारमध्ये असलेले दिपक संभाजी हारे, रोहिणी दिपक हारे या पती पत्नी सह त्यांचा मुलगा दक्ष दिपक हारे, वय १० वर्षे, तिघे रा. लोणी, हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर राहुरी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर चांगुनाबाई पवार यांना राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण क्षिरसागर यांनी त्यांना तपासून उपचारा पूर्वीच मयत घोषित केले. घटनेची माहिती कळताच डिग्रस परिसरातील नागरिकांनी रुग्णालया समोर प्रचंड गर्दी केली होती. चांगुनाबाई पवार यांच्या अपघाती निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.




## || दशक्रियाविधी ||



**कै. चांगदेव बबन पा. गुंड**

यांना गुरुवार दि.०९/०७/२०२६ रोजी देवाज्ञा झाली. त्यांचा दशक्रियाविधी शनिवार दि.१८/०७/२०२६ रोजी सकाळी ९.०० वा. होणार आहे. तसेच तेरावाविधी मंगळवार दि.२१/०७/२०२६ रोजी राहत्या घरी गुंड वस्ती नाऊर येथे होईल.

* शोकाकुल *

गं.भा. सुशिला चांगदेव गुंड (पत्नी)
श्री. अशोक बबन गुंड (भाऊ)
श्री. कृष्णा चांगदेव गुंड (मुलगा)
श्री. दत्तात्रय चांगदेव गुंड (मुलगा)
सौ. सुरेखा विजय घाडगे (मुलगी)
श्री. विजय कुंडलिक घाडगे (जावई)
श्री. हरिश्चंद्र (आप्पा) अशोक गुंड (पुतणे)

**समस्त गुंड पाटील परिवार**

स्थळ : नाऊर बंधारा, नाऊर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर
टीप : ह.भ.प. कृष्णाजी महाराज कुंजीर (अध्यक्ष, श्री ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था, श्रीक्षेत्र नाऊर) यांचे प्रवचन होईल.


# गोदामात १०० टन युरियाचा बफर स्टॉक पडून

## शेतकऱ्यांच्या घामाशी लालफितीचा क्रूर खेळ!



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : खरीप हंगाम ऐन भरात असताना सोनगाव, सात्रळ, धानोरे, हनुमंतगाव, पाथरे व परिसरातील हजारो शेतकरी युरिया खतासाठी अक्षरशः दारोदारी भटकत आहेत. मात्र, दुसरीकडे संबंधित विभागाच्या गोदामात ९० ते १०० टन युरिया खताचा बफर स्टॉक उपलब्ध असूनही केवळ प्रशासकीय परवानगीअभावी त्याचे वितरण होत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या संतापाचा बांध फुटला असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. मका, सोयाबीन, बाजरी, कापूस आणि भाजीपाला या पिकांच्या वाढीसाठी सध्या युरियाची अत्यंत गरज आहे.

### शेतकऱ्यांचा संतप्त सवाल

गोदामात साठा असताना शेतकरी वंचित का? युरियाचा साठा उपलब्ध असूनही केवळ कागदी परवानग्यांमुळे तो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? खरीप हंगामाच्या निर्णायक टप्प्यावर हा विलंब शेतकऱ्यांच्या उत्पादनावर आणि उत्पन्नावर घाला घालणारा ठरत असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

याच टप्प्यावर खताचा पुरवठा खंडित झाल्याने शेतकरी कृषी सेवा केंद्रे, सहकारी सोसायट्या आणि खत विक्रेत्यांच्या दारात हेलपाटे मारत आहेत. अनेक ठिकाणी साठा संपला असे सांगितले जात असताना सरकारी गोदामात मात्र युरियाची पोती पडून असल्याची माहिती शेतकऱ्यांच्या रोषात भर घालत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बफर स्टॉक खुला करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे वितरण यंत्रणा ठप्प झाली आहे. वेळेत युरिया न मिळाल्यास पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधीच अवकाळी पाऊस, वाढलेले उत्पादन खर्च, मजुरीची टंचाई आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा दर यामुळे आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी हा आणखी एक मोठा आघात मानला जात आहे.

गोदामात खत असूनही आम्हाला रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. पिके अधिकाऱ्यांच्या परवानगीवर वाढत नाहीत. योग्य वेळी युरिया मिळाली नाही तर संपूर्ण हंगाम धोक्यात येईल, अशी संतप्त प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. कृषी क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे की, युरियाचा वापर योग्य वाढीच्या अवस्थेत झाला नाही, तर उत्पादनात मोठी घट होऊ शकते. त्यामुळे गोदामातील बफर स्टॉक तातडीने खुला करून शेतकऱ्यांना युरिया उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे.

अन्यथा त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण खरीप हंगामावर होऊ शकतात. दरम्यान, या गंभीर प्रश्नावर संबंधित विभागाकडून अद्याप स्पष्ट भूमिका घेण्यात आलेली नाही. त्यामुळे परिसरात नाराजीचे वातावरण असून, तातडीने युरिया वितरण सुरू न झाल्यास शेतकरी संघटना व ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## राजुरमध्ये बनावट व प्रतिबंधित मद्यसाठ्यावर छापा; ६.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : अकोले तालुक्यातील राजूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राजूर येथील वंजार गल्ली परिसरात अवैध मद्यसाठ्यावर कारवाई करत राजूर पोलिसांनी चारचाकी वाहनासह एकूण ६ लाख ६४ हजार ३३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत विविध कंपनींच्या मद्याच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या असून त्यातील काही मद्य बनावट तर काही महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. राजूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना गुरुवारी रात्री गुप्त बातमीदारामार्फत वंजार गल्ली परिसरात चारचाकी वाहनातून अवैध मद्यसाठा आणल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस कॉन्स्टेबल सचिन शिंदे, वाय. एन. जाधव, डी. डी. परते व एस. वाय. रत्नपारखी यांनी दोन पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला. कारवाईदरम्यान एमएच-०३-एआर-०१९४ क्रमांकाच्या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे १ लाख ६४ हजार ३३५ रुपयांच्या विविध कंपनींच्या मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. वाहनाचे मालक सोनू दिलीप मुर्तडक (वय २८) यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक सावखेडकर यांना पाचारण करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून मद्यसाठा व वाहन जप्त करण्यात आले. मद्याच्या नमुन्यातील प्रत्येकी तीन बाटल्या तपासणीसाठी सीलबंद करून रासायनिक विश्लेषणासाठी नाशिक येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आल्या आहेत. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.